





# उन्हाचा तडाखा अन् मृतदेहांचा सडा!

## स्मशानभूमीत मिळेना जागा

## जामनेरात गेला नऊ जणांचा बळी!

**जामनेर । प्रकाश सैतवाल**

शहरात व तालुक्यात तापमानाचा पारा प्रचंड वाढला असून ४६ -४७ डिग्रीपर्यंत तापमान गेल्याने उष्माघाताने कहर केला असून शनिवारी एकाच दिवशी शहरातील नऊ जणांचा बळी उष्माघाताने घेतल्याचे बोलले जात असून तापमानामुळे कोणाला अटॅक येऊन तर कुणी आजारी पडून मृत्यू पावले आहे. जामनेरच्या स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी पाच मृतदेह जाळण्याची व्यवस्था असताना अचानक नऊ जणांचे मृतदेह स्मशानभूमित आल्याने एनवेळी व्यवस्था कशी करावी असा प्रश्न स्मशानभूमी व्यवस्थापकापूढे निर्माण झाला होता.

इंदुबाई तापीराम पाटील (वय ८३) राहणार आनंदनगर जामनेर यांना उष्माघाताने हृदयविकाराचा झटका येऊन त्यांचा मृत्यू झाला. जगन्नाथ विश्वनाथ थेटे (वय ५४) राहणार बजरंगपुरा जामनेर यांचाही उष्माघाताने बळी घेतला. तर दिलीप रामभाऊ येणे (वय ५०) राहणार दत्त चैतन्य नगर, सखुबाई (पूर्ण नाव माहित नाही), रघुनाथ लोहार (वय ७०) राहणार जामनेर पुरा, साहेबराव तोताराम पान २ वर



### धुळ्यात शवविच्छेदनासाठी लागली रांग

येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या शवागारात दररोज सरासरी ४-५ मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी दाखल होत असतात. मात्र, हा आकडा अचानकपणे वाढला असून आज तब्बल दहा मृतदेह पीएमसाठी दाखल झाले आहेत. हिरे रुग्णालयात अत्यवस्थ रुग्ण भरती होत असतात. यापैकी काहींचा मृत्यू अपघाताने, घातपाताने झालेला असतो. संशयास्पद मृत्यू झालेला असल्यास मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात येते. हिरे रुग्णालयाच्या शवागारात दररोज चार ते पाच मृतदेह पीएमसाठी दाखल होत असतात. परंतु, आज त्या ठिकाणी १० मृतदेह पीएमसाठी दाखल आहेत. हा आकडा अचानकपणे का वाढला; हे सांगणे कठीण आहे. मात्र, उष्माघाताचे कोणतेही रुग्ण हिरे रुग्णालयात भरती नाहीत किंवा तशा प्रकारचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आलेले नसल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजित पाठक यांनी दिली आहे.

## जळगावात आठ बेवारस मृतदेह

## उष्माघाताची शक्यता : प्रशासनाचा इन्कार

**जळगाव । लालचंद अहिरे**

सध्या जिल्ह्यातील तापमान ४६ ते ४७ अंशापर्यंत पोहोचले आहे. तापमानाने उच्चांक गाठल्याने दिवसा घरात बसणे देखील आता कठीण झाले आहे. अशा या परिस्थितीत दुपारच्या रणरणत्या उन्हात बाहेर फिरणाऱ्यांना उष्माघाताचा मोठा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात गेल्या २४ तासात जळगाव शहरात ८ बेवारस मृतदेह आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. वाढत्या तपमनामुळे हे मृत्यू झाले आहेत का याची गांभीयाने चौकशी करण्याची गरज आहे. दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी हे उष्माघाताचे बळी असल्याची शक्यता नसल्याचे म्हटले आहे.

गेल्या दोन दिवसात जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात १६ मृतदेह दाखल झालेले आहेत. त्यात ९ मृतदेह बेवारस असून सर्व मृतदेह २५ ते ६५ वयोगटातील आहेत. यातील आठ मृतदेह जळगाव शहरातील असून एक भुसावळ येळील आहे.



अचानक मृत्यूची संख्या वाढल्याने शवागारात मृतदेह ठेवण्यासाठी जागा कमी पडत असून शुक्रवारी १० मृतदेह फ्रिजमध्ये तर सहा मृतदेह हे खाली जमिनीवर ठेवण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ८ फ्रिज आहे. ८ मृतदेहांचे सकाळी शवविच्छेदन करण्यात आले तर दुपारनंतर उर्वरीत मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात येणार आहे. शुक्रवारी सापडलेल्या मृतदेहांची ओळख पटवण्याचे काम सुरु असून ओळख न पटल्यास तीन दिवसात त्यांच्यावर देखील अंत्यसंस्कार करण्यात येतील, असे शासकीय रुग्णालयाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.

रणरणत्या उन्हामुळे रस्त्यावर राहणाऱ्या व्यक्तींना जेवण तसेच पाणी वेळेवर न मिळाल्याने आधीच त्यांची प्रतिकारशक्ती कमी झालेली असते. त्यातच उष्णतेच्या पान २ वर

> जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात १६ मृतदेह दाखल झालेले आहेत. त्यात ९ मृतदेह बेवारस आहे. या अनोळखी इसमांचा मृत्यू उष्माघातामुळे झाला की अन्य कारणामुळे झाला हे शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर स्पष्ट होईल.
>
> ■ डॉ.गिरीश ठाकूर, अधिष्ठाता, शासकीय महाविद्यालय व रुग्णालय

> सदर अनोळखी व्यक्तींचा मृत्यू उष्माघातामुळेच झाला असे म्हणता येणार नाही. मृतदेहाचे शवविच्छेदन झालेले नाही. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर चित्र स्पष्ट होईल. उष्माघाताची घटना घडल्यास त्याबाबत महापालिका किंवा जिल्हा रुग्णालयाकडून जिल्हा प्रशासनाला माहिती दिली जाते.
>
> ■ आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी, जळगाव

## थोडक्यात

### उद्या लागणार दहावीचा निकाल

**पुणे ।** महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या निकालाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी या संदर्भातील घोषणा परिपत्रकाद्वारे केली. त्यानुसार सोमवारी म्हणजेच २७ मे रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची निकालाबाबतची उत्सुकता आता संपुष्टात येणार आहे. यंदा दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विद्यार्थी दुपारी एक वाजल्यापासून ऑनलाइन निकाल पाहू शकतात. ऑनलाइन निकालानंतर दहावीच्या परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मुल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करता येईल. गुणपडताळणी आणि छायाप्रतीसाठी २८ मे ११ जून या कालावधीत ऑनलाइन अर्ज करून शुल्क भरता येईल.



### हिट अँड रनप्रकरणी दोन गुन्हे दाखल

**पुणे ।** पुण्यातील कल्याणीनगर भागात झालेल्या हीट अँड रन प्रकरणात पोलिसांनी दोन गुन्हे दाखल केल्यानंतर आता आणखी एक गुन्हा दाखल केला आहे.अपघातग्रस्त कार मधील चालकावर टाकून संबंधित कार अपघातावेळी अल्पवयीन मुलगा नाहीतर तूच चालवत होता असा जबाब पोलीसांना दे असे सांगत त्याचा मोबाईल फोन काढून घेत त्याला घरात डांबून ठेवल्याचा प्रकार पोलीस चौकशीत उघडकीस आला आहे. त्यानंतर पोलीसांनी याप्रकरणी अगरवाल यांचा कारचालक गंगंधर पुजारी याच्या तक्रारीनुसार मुलाचे आजोबा व वडील यांच्यावर भादवी कलम ३६५, ३६८ नुसार गुन्हा दाखल केला आहे. तसेच अल्पवयीन मुलाच्या आजोबाला देखील पोलीसांकडून अटक करण्यात आली आहे.

## भरधाव डंपरने धडक दिल्याने काकाचा मृत्यू, पुतण्या जखमी

**दोंडाईचा ।** शहरातील नंदुरबार रस्त्यावरील रामी ता. शिंदखेडा फाट्याजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या डंपरने ओव्हरटेक करतांना दुचाकीला धडक दिली. यात काकाचा जागीच मृत्यू झाला तर पुतण्या गंभीर जखमी झाला. त्याच्यावर धुळे येथे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना आज दि. २५ रोजी दुपारी १.३० वाजेच्या सुमारास घडली.



दिलीप देवराम माळी (सूर्यवंशी) वय ४८ वर्षे रा. सोनशेलु ता. शिंदखेडा हे त्यांच्या पुतण्या सुजय रवींद्र माळी याला सोबत घेऊन त्यांच्या मालकीची स्प्लेंडर मोटर सायकल क्रमांक एमएच ३९ इ ३०७९ ने नंदुरबारहुन दोंडाईचाकडे येत असतांना रामी फाट्याजवळ डंपर क्रमांक जी. जे. १९ वाय ७९६१ याच्यावरील चालकाने ओव्हरटेक करण्याच्या नादात रॉंगसाईडने येऊन समोरील येणारी मोटरसायकलला जबर धडक दिली.

या अपघातातील जखमींना तातडीने उपस्थित नागरिकांनी दोंडाईचा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी काका दिलीप देवराम माळी (सूर्यवंशी) यांना मयत घोषित केले. तर पुतण्या सुजय रवींद्र माळी यांना प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी धुळे येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. डंपर चालकाने खबर न देता पळ काढल्याने याप्रकरणी डंपर चालकाविरुद्ध दोंडाईचा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास साहय्यक पोलिस निरीक्षक निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक हेमंत राऊत हे करीत आहेत.



**नवी दिल्ली । सहाव्या टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तसेच काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी व राहुल गांधी यांनी दिल्लीत मतदान केले.**

## सहाव्या टप्प्यात ६० टक्के मतदान

**नवी दिल्ली ।** लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात ७ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशातील ५८ जागांसाठी शनिवारी सायंकाळी ६ वाजता मतदान संपले. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी ७ वाजेपर्यंत ५८ जागांवर ५८.८२ टक्के मतदान झाले. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७८.१९% आणि सर्वात कमी जम्मू आणि काश्मीरमध्ये ५१.४१% मतदान झाले. पाच टप्प्यात ४२९ जागांवर मतदान झाले. शेवटच्या ५६ जागांसाठी १ जून रोजी मतदान होणार आहे.

पश्चिम बंगालमधील झारग्राममधील भाजप उमेदवार प्रणंत तुडू यांच्यावर हल्ला करण्यात आला. दगड लागल्याने त्याचा सुरक्षा रक्षक जखमी झाला. मतदारांना धमकावल्याची तक्रार मिळाल्यानंतर तुडू गडभेटा येथील एका बूथला भेट देत होते. प्रणत तुडू यांच्या गाडीचीही तोडफोड करण्यात आली आहे. भाजपने टीएमसीवर हल्ल्याचा आरोप केला आहे. यावर निवडणूक आयोगाने सांगितले - मतदान सुरू होण्यापूर्वी उमेदवारांचे एजंट स्वाक्षरी करतात. या केंद्रांवर टीएमसी एजंट उपस्थित नव्हते, त्यामुळे फक्त भाजप एजंटांच्या सह्या आहेत. पश्चिम बंगालमधील तमलूकमध्ये मतदानापूर्वी भाजप कार्यकर्त्यांसोबत झालेल्या झटापटीत टीएमसी समर्थक जखमी झाला.

## विषाची परीक्षा घेऊ नका!

### मल्लिकार्जुन खरगेंची मोदींवर जहरी टीका



**कोलकाता ।** पंतप्रधान मोदी हे विषासमान असून गेल्या दहा वर्षात त्यांनी केलेल्या वाईट कामांचा आपण प्रत्यय घेतला आहे.त्यामुळे आगामी शेवटच्या टप्प्यात होणाऱ्या मतदानावेळी भाजपाला मतदान करून विषाची परीक्षा घेवू नका अशी टीका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे यांनी केली आहे.

मल्लिकार्जुन खरगेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर शेलक्या शब्दांत टीका केली आहे. आज संध्याकाळी ६ वाजता सहाव्या टप्प्यातले मतदान संपले आहे. तर १ जूनच्या दिवशी लोकसभा निवडणुकीचा सातवा टप्पा पार पडणार आहे.


पंतप्रधान नरेंद्र मोदी गंगेने बोलवून घेतले आहे. २०४७ पर्यंत ते शासन करणार आहेत असेही त्यांचे म्हणणे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गंगेत डुबकी मारतात, गुहेत जाऊन बसतात, ध्यानधारणा करतात, तपश्चर्या करतात. या सगळ्याचे फळ त्यांना मिळणार असेल तर माहीत नाही. मला वाटते की काम केले की तुम्हाला दोनवेळची भाकरी मिळते. असे वक्तव्य खरगेंनी केले आहे.

मल्लिकार्जुन खरगे पुढे म्हणाले, चांगले काम केले की चांगला निकाल लागतो, वाईट काम केले की वाईट निकाल लागतो. जर वाईट करुन चांगला निकाल लागतो असे असेल तर काय बोलणार? आम्ही जर म्हटले हे विष आहे त्याला हात लावू नकोस. तरीही एखादा माणूस म्हणाला मी विष चाटून पाहतो काय होईल? मोदींचे तसेच आहे. असा टोला मल्लिकार्जुन खरगेंनी लगावला आहे.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1340 |
| नवती (२) | : 1190 |
| पिलबाग | : --- |
| वापसी | : --- |

### मिश्कीली




## विधान परिषद निवडणुकीत मविआत बिघाडी!

### ठाकरेंकडून अनिल परब, अभ्यंकर यांना मुंबईतून उमेदवारी जाहीर

**मुंबई ।** लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधान परिषदेची निवडणुकाही आघाडी करून लढविली जाण्याची शक्यता आहे. मात्र, ठाकरे गटाने मुंबईतील दोन उमेदवार जाहीर केले आहेत. नाशिक शिक्षकचे प्रतिनिधित्व करणारे किशोर दराडे हे उद्धव ठाकरे गटाच्या जवळचे आहेत. त्यामुळे ही जागा ठाकरे गटाच्या पाठिंब्याने लढवली जाऊ शकते. गेल्यावेळी म्हणजे २०१८ मध्ये कोकण पदवीधरची निवडणूक शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकमेकांच्या विरोधात लढवली होती. तेव्हा दोन्ही पक्षात फूट पडलेली नव्हती. अशातच कोकण पदवीधरच्या जागेवर काँग्रेसने हक्क सांगितला आहे. मुंबई शिक्षकमधून काँग्रेसचे प्रकाश सोनवणे निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. मात्र, ठाकरे गटाने उमेदवार जाहीर केल्याने काँग्रेसची गोची झाली आहे. त्यामुळे मतदारसंघ वाटपावरून आघाडीत बिघाडी होण्याची चिन्हे आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने विधान परिषदेच्या चारपैकी दोन जागांवरील उमेदवारांची घोषणा केली आहे. त्यानुसार मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब तर मुंबई शिक्षक मतदारसंघातून ज.मो. अभ्यंकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. ठाकरे गटाकडून शुक्रवारी रात्री या दोन नावांची घोषणा करण्यात आली. परब यांना उमेदवारी मिळाल्याने मावळते आमदार विलास पोतनीस यांचा पत्ता कापण्यात आला आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर तसेच मुंबई आणि नाशिक शिक्षक या चार मतदारसंघासाठी येत्या २६ जून रोजी निवडणूक होत आहे. ही निवडणूक महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने मुंबई पदवीधर आणि मुंबई शिक्षक या दोन मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा केली आहे. मुंबई पदवीधरमधून उमेदवारी मिळालेल्या अनिल परब यांची विधान परिषदेची मुदत येत्या २७ जुलै रोजी संपत आहे. शिवसेनेतील फुटीमुळे अनिल परब यांना पुन्हा विधान परिषदेवर निवडून आणण्या इतके संख्याबळ ठाकरे गटाकडे नाही. त्यामुळे ठाकरे गटाने परब यांना मुंबई पदवीधरची उमेदवारी दिली आहे. परब यांची उमेदवारी निश्चित झाल्याने विलास पोतनीस यांची मुंबई पदवीधर मतदारसंघाचे दुसऱ्यांदा प्रतिनिधित्व करण्याची संधी हुकली आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी ठाकरेंच्या युवा सेनेचे नेते वरुण सरदेसाई यांचेही नाव चर्चेत होते. मात्र त्यांच्याऐवजी परब यांना तिकीट देण्यात आले आहे.




पान १ वरुन ...

## जामनेरात गेला नऊ जणांचा बळी!

चौधरी राहणार कासोदा (वय ८४) हे आपल्या मुलीकडे गिरजा कॉलनी येथे पाहुणे म्हणून आले असताना उष्माघाताने त्यांचा बळी घेतला तर अतुल पाटील होली पॅलेस जामनेर (वय ३५) हा तरुण चक्कर येऊन पडल्याने त्याचा बळी गेला .असे शहरातील एकूण नऊ जण उष्माघाताचे बळी ठरले आहे.

याआधी पंधरा दिवसांपूर्वी शेंगोळा येथील २७ वर्षीय तरुण सादिक अल्लाउद्दीन तडवी हा शेतातून घरी आल्यावर त्याचा मृत्यू झाला .तर २२ मे रोजी खादगावचे माजी उपसरपंच प्रमोद चौधरी यांचा २२ मे रोजी दुपारी दीड वाजता शेतातून घरी आल्यावर उष्माघाताने त्यांचा बळी घेतला. उन्हाचा प्रचंड पारा वाढल्याने नागरिक हैराण झाले असून शेतीच्या मशागतीची कामेही रखरखत्या उन्हामुळे थंडावली असून जनतेने गरज असेल तरच बाहेर पडावे असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉक्टर राजेश सोनवणे यांनी केले आहे.

## जळगावात आठ बेवारस मृतदेह

लाटांचा त्यांना सामना करावा लागत असल्याने जीव गमवावा लागतो. पोलिसांसमोर अनोळखी व्यक्तींची ओळख पटवण्याचे मोठे आव्हान आहे. त्यातच शवागारगृहात मृतदेह ठेवण्यासाठी जागा कमी पडत आहे. रुग्णालयातील नियमित मृत्यू, विविध घटनांमधील मृत्यू हे मृतदेह देखील याच ठिकाणी आणले जात आहेत. आतापर्यंत सापडलेल्या मृतदेहांत त्या व्यक्तींना काहींना काही आजार, प्रतिकारशक्ती कमी आहे, हे जरी दिसून येत असले तरी उष्णतेचा परिणाम झाल्याचे सांगितले जाते आहे. वाढती बेवारस मृतदेहांची संख्या लक्षात घेता जिल्हा रुग्णालय प्रशासनाने चिंता व्यक्त केली आहे.

# रामदेववाडीतील मयत आशा वर्करच्या परिवाराला न्याय द्या!

## उद्या जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे निदर्शने

■ जळगाव । प्रतिनिधी

रामदेववाडी गावातील आशा वर्कर वत्सला चव्हाण व त्यांची मुले, भाचा दुचाकीने जात असताना त्यांच्या वाहनाला भरघाव येणाऱ्या कारने ठोस देऊन त्यात श्रीमती चव्हाण व त्यांची दोन मुलं तसेच भाचा मरण पावलेत. त्यावेळी रामदेववाडी निवासी ग्रामस्थ यांच्यामध्ये संतापाची लाट उसळल्याने व या अपघात प्रकरणीदेखील अद्यापही कोणतीही मोठी कारवाई जळगाव जिल्हा पोलिसांनी न केल्यामुळे ग्रामस्थांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार तर टाकलाच तर दुसरीकडे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करून या जबाबदार कारचालक मालक यांचेवर कारवाई करावी, अपघातग्रस्त कुटुंबांना मदत करावी म्हणून आंदोलन देखील केले. जळगाव जिल्हयात तीन तीन मंत्री आहेत; पण घटनेची दखल का घेत नाहीत,असा



प्रश्नही जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

त्या कारचे चालक-मालक यांचेवर गुन्हा दाखल व्हावा व जबाबदार यांना कायदेशीर रित्या गजाआड करावे, अशी मुख्य मागणी जळगाव जिल्हा आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटना आयटकने जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पोलीस अधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनात केली आहे. अन्यथा येत्या दि.२७ मे रोजी जळगाव जिल्हा परिषदेसमोर धरणे व निदर्शने करण्यात येईल, असाही इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमृत महाजन, सचिव सुलोचना साबळे यांनी दिला आहे.

कामगार नेते कॉ अमृत महाजन व गटप्रवर्तक संघटनेच्या जिल्हा नेत्या सुनिता ठाकरे, संजय बागड व शिरसोली येथील आशा वर्कर या सर्वांनी रामदेव वाडी येथे जाऊन श्रीमती चव्हाण परिवाराला भेट देऊन सांत्वन केले.गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताची ताबडतोब दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाइ करावी, रामदेव वाडीतील अपघातप्रकरणी मृतांच्या नातेवाइकांना प्रत्येकी २५ लाख रुपये भरपाई द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## तापमान दोन अंशाने घटले

**जळगाव ।** गेल्या काही दिवसांपासून जळगावचे तापमानात वाढ झाली होती. मात्र, आज वातावरणात बदल झाल्याने ४५ अंशावरुन ४३.८ अंशावर येऊन ठेपले आहे. मात्र, उन्हाची दाहकता कायम असल्याने नागरिकांना सध्या तरी दिलासा मिळालेला नाही. उन्हामुळे भरदुपारी शहरातील रस्ते ओस पडत आहे. आज शनिवार बाजाराचा दिवस असूनही मार्केट परिसरातील दुपारच्या सुमारास शुकशुकाट असल्याचे चित्र होते. सुर्य आग ओकत असल्याने अघोषित संचारबंदीचा देखावा शहरात दिसुन येत होता.

# मागील भांडणाच्या कारणावरून हाणामारी, १८ जणांवर गुन्हा

■ धुळे । प्रतिनिधी

शिंदखेडा तालुक्यातील दरखेडा गावात मागील भांडणाच्या कारणावरून लाठ्यांसह घरात शिरून घरातील सदस्यांना बेदम मारहाण केली. याप्रकरणी शिंदखेडा पोलीस ठाण्यात परस्पर फिर्यादीवरून १८ जणांवर दंगलीसह इतर कलमांतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

गुलाबराव भाईदास पाटील, (५३), रा.दरखेडा, ता.शिंदखेडा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, भाऊसाहेब मोहन पाटील, ताथु चैत्राम पाटील, वेडू भाईदास पाटील, उमाकांत शालीग्राम पाटील, ज्ञानेश्वर ताथु पाटील, महेंद्र वेडु पाटील, मनोज वेडु पाटील, यश भाऊसाहेब पाटील, दिवेश काशिनाथ पाटील सर्व रा.दरखेडा, ता.शिंदखेडा हे दि.२४ मे रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास लाठ्या घेवून घरात शिरले. त्यांनी गुलाबराव पाटील यांच्यासह दोन्ही मुलांना लाठ्या-काठ्यांनी मारहाण केली. तसेच घराच्या दरवाजासह संसारोपयोगी साहित्याची तोडफोड केली. यावेळी गुलाबराव पाटील यांच्या खिशातील १५ हजार रूपये गहाळ झाले. या फिर्यादीवरून वरील नऊ संशयितांविरूध्द शिंदखेडा पोलीस ठाण्यात दंगलीसह इतर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आली आहे. तपास असई गुलाब ठाकरे हे करीत आहेत. तर परस्पर फिर्यादीत भाऊसाहेब मोहन पाटील, (५३), रा.दरखेडा, ता.शिंदखेडा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अक्षय गुलाबराव बागुल, हेमंत गुलाबराव पाटील, गुलाबराव भाईदास पाटील, सुनिता गुलाबराव पाटील, रेणुका हेमंत पाटील, निखील राजेंद्र पवार, वैभव अशोक बागुल, गायत्री अशोक बागुल, शुमा (पुर्ण नाव निष्पन्न नाही) हे रात्री ८ वाजेच्या सुमारास घरात शिरले व त्यांनी भाऊसाहेब पाटील यांच्यासह मुलास व पुतण्यात बेदम मारहाण केली. तसेच शिवीगाळ करीत जीवे ठार मारण्याची धमकीही दिली.

या फिर्यादीवरून शिंदखेडा पोलीस ठाण्यात वरील नऊ संशयितांवर दंगलीसह इतर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोहेकॉ प्रशांत पवार हे करीत आहेत.

जन्म/मृत्यु नोंदणीचा जाहिरनामा

**जाहिर नोटिस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार दोंडाईचा. जि. धुळे. यांचे न्यायालय**

क्र. कावि/दंडप्र. २५/ २०२४
तहसिलदार यांचे कार्यालय दोंडाईचा
दि. ३०/०४/२०२४

श्री रणजितसिंग रघुनाथसिंग गिरासे
रा. वणी. ता. शिंदखेडा.जि. धुळे........अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत वणी ता. शिंदखेडा
जि.धुळे............................ सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठी अर्ज मे. कोर्टात केला असुन त्या अर्जात अर्जदार यांचा जन्म दि.१२/०४/१९५९ रोजी वणी ता. शिंदखेडा. जि. धुळे येथे झाला आहे. मात्र अजंदार यांची जन्म तारखेची नोंद जन्म/मृत्यु नोंदणी ग्रामपंचायत वणी ता.शिंदखेडा जि. धुळे येथे करण्यात आलेली नाही. ग्रामपंचायत वणी यांनी दप्तरी नोंद आढळ होत नसल्याबाबत दाखला दिलेला आहे. अर्जदार यांनी त्यांचा जन्माची नोंद होणेकामी इकडिल न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराचा जन्माची तारखेची नोंदणी शासकीय/निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याचे अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्मांची नोंदणी करुन मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरहु अर्जदार यांचा जन्माची नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेख्यावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराचा जन्माची नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल.

आज दि. /०४/२०२४ रोजी माझ्या सहीने व मे न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले असे.

**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**अपर तहसिलदार दोंडाईचा**

## वैद्य प्रवीण पाटील आज जळगावात

■ जळगाव । प्रतिनिधी –

पुण्याचे वैद्य प्रविण पाटील एम.डी आयुर्वेद तथा नाडी तज्ञ हे आपल्या श्री विश्व आयुर्वेदामृत या आयुर्वेदीय पंचकर्म चिकित्सालय व संशोधन केंद्र, पुणे अंतर्गत जळगाव शाखेत दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी तसेच शहादा येथे महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी सेवा देत असतात. उंची वाढविणे व सर्व आजारांसाठी नाडी परिक्षणाने उपचार रविवार आज दि. २६ मे २०२४ रोजी डॉ. उभाड पाटील मुलांचे व डोळ्यांचे हॉस्टिल, ढाके कॉलनी, जळगाव येथील शाखेत सेवा देत आहे. नाडी परीक्षणाने परिपुर्ण अशा आयुर्वेदीय चिकित्सेने असंख्य रुग्णांना त्यांनी पुर्णपणे बरे केले आहे. त्यात स्त्रीयांचे आजार, संतती प्राप्ती होण्यासाठी स्त्री बिज उत्पन्न न होणे, बीजग्रंथींची विकृती, बीजवाहिन्यांची विकृती, शुक्रजंतुंच्या विकृती, वारंवार होणारा गर्भस्त्राव / गर्भपात, सदृढ व निरोगी संतती साठी, मासिक पाळीच्या तक्रारी, उंची वाढविणे (सल्ला). वंध्यत्व (सदृढ व निरोगी आपत्य प्राप्तींसाठी ) हृदयविकार (रक्तवाहिन्यांमधील ब्लॉकेज), रक्तदाब, पाठीच्या मणक्यांचे सर्व आजार, आम्लपित्त व पचनाच्या सर्व तक्रारी, स्त्रीयांचे / बालकांचे सर्व आजार, गर्भसंस्कार, त्वचारोग, सोरायसीस, किडनी फेल्युअर, मूतखडा, मूळव्याध, विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, वुध्दी वाढविणे, सौंदर्यविषयक तक्रारी, मानसिक आजार तसेच कॅन्सर व एडस् (उपचार व सल्ला), विषाणुजन्य साथीचे आजार होऊ नये व यासाठी आपली रोगप्रतीकार क्षमता वाढविणे साठी व सर्व आजारांसाठी परीपुर्ण आयुर्वेदीय उपचार आदींवर बहुसंख्य रूणांना कायमचा आराम पडलेला आहे. काहींच्या शस्त्रक्रियाही वाचल्या आहेत तरी इच्छुकांनी आज सकाळी ९ ते सायं. ७ यावेळेस लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील फोन नंबरवर संपर्क साधावा. मो. ९९७०२६६६००, ९४२३२५२७९१.

## पाण्यात बुडून १४ वर्षीय बालकाचा मृत्यू

■ जळगाव । प्रतिनिधी

म्हशी चारण्यासाठी गेलेला हर्षल अशोक चौधरी (वय १४, रा. नशिराबाद, ता. जळगाव) हा मुलगा अंघोळीसाठी मुर्दापूर धरणाच्या पाण्यात पोहणासाठी उतरला. परंतु त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा बुडनू दुर्देवी मृत्यू झाला. ही घटना शनिवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास उघडकीस आली. पाच बहीणींचा एकुलत्या एक भावाचा दुर्देवी मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

जळगाव तालुक्यातील नशिराबाद येथे वास्तव्यास असलेला हर्षलचे आई वडील हातमजूरी करून कुटुंबाचा उदनिर्वाह करतात. घरची परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने आणि तसेच शाळेला सुट्‌ट्या असल्यामुळे हर्षल हा गावातील काही जणांच्या म्हशी घेवून त्या चरण्यासाठी गावाजवळ असलेल्या मुर्दापूर धरणाच्या परिसरात जात होता. आज देखील तो म्हशींना चरण्यासाठी घेवून गेला होता. तेव्हा ही घटना घडली.

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१-०४-२०२४ ०६-०४-२०२४ | १०० ९६ ४४८ | ८८० ६४ ३३८ | ६६७ ९७ ३५९ | ४५५ ४२ ४७० | ६८० ४९ २८९ | १४८ ३६ १२३ |
| ०८-०४-२०२४ १३-०४-२०२४ | ३४७ ४४ ३३८ | २५५ ३२ २५५ | २३३ ८८ ५५८ | १७० ८३ २२९ | ६०० ६४ ३४७ | ३६७ ६७ २२३ |
| १५-०४-२०२४ २०-०४-२०२४ | ११२ ४६ ७९० | २७० ९७ १६० | ३५७ ५२ ६७९ | ९९० ८१ १३७ | ३७० ०२ ३४५ | २३५ ०४ ६८० |
| २२-०४-२०२४ २७-०४-२०२४ | ५६९ ०३ २५६ | २४८ ४९ ५७७ | २५७ ४२ १४७ | १६० ७८ ४६८ | ३५८ ६७ ८९० | ५६९ ०२ ३९० |
| २९-०४-२०२४ ०४-०५-२०२४ | ७७९ ३३ ५८० | ५६८ ९२ १३८ | २३० ५८ १८९ | ३४९ ६० १३६ | १४५ ०८ ४६८ | ३९० २४ २५७ |
| ०५-०५-२०२४ ११-०५-२०२४ | १४७ २७ २५० | ५८९ २१ ३३५ | ३५७ ५४ ३४७ | ३५९ ७९ १८० | ६६८ ०१ ४८९ | १५८ ४४ ७८९ |
| १३-०५-२०२४ १८-०५-२०२४ | २३४ ९८ ३६९ | १४९ ४० ५६९ | ३४७ ४५ २४९ | ५६८ ९६ ४५७ | २६७ ५३ ७७९ | २३८ ३० १९० |
| २०-०५-२०२४ २५-०५-२०२४ | १५६ २६ १५० | ३४९ ६६ ११४ | १३३ ७० ११८ | १३६ ०२ ५८९ | ३९९ १६ २४० | ३४७ ४२ १४७ |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१-०४-२०२४ ०६-०४-२०२४ | ४८९ १० २४४ | २७० ९२ ४८० | ५६८ ९१ ३३५ | १९० ०३ ७७९ | ५८८ १८ २३३ | १२३ ६३ २४७ | ● |
| ०८-०४-२०२४ १४-०४-२०२४ | २४६ २५ २४९ | ४४८ ६० २२६ | २४९ ५६ २६८ | १४८ ३७ ५५७ | १३८ २१ ५७९ | १३८ २६ २५९ | ● |
| १५-०४-२०२४ २१-०४-२०२४ | २६९ ४० ६६८ | ३४० ४२ ५७० | ७७८ २५ १७७ | १२५ ८८ ३५० | ५६७ ८६ १७८ | ३७० ०४ १६७ | ● |
| २२-०४-२०२४ २८-०४-२०२४ | २४६ २७ १७९ | २३५ ०७ ७०० | ३५८ ६६ ३५८ | २२६ ०६ २४० | ४४५ ३१ ११९ | २६० ८० २३५ | ● |
| २९-०४-२०२४ ०५-०५-२०२४ | ३४६ ३३ १३९ | १८९ ८९ १२६ | ४६९ ९५ ३५७ | ३६९ ८९ ३७९ | १७७ ५६ १६९ | २६८ ६६ १७८ | ● |
| ०५-०५-२०२४ १२-०५-२०२४ | ६०० ६४ १५८ | १७९ ७९ १३५ | ११६ ८३ ६७० | ६८८ २९ १९९ | ९०० ९४ ११२ | १२४ ७७ २६९ | ● |
| १३-०५-२०२४ १९-०५-२०२४ | २७९ ८२ १३८ | १४७ २९ २३४ | १६७ ४९ ३७९ | ४५७ ६५ १४० | ३३४ ०८ १७० | ५९९ ३७ ११५ | ● |
| २०-०५-२०२४ २६-०५-२०२४ | ११४ ६५ ६९० | १६० ७७ ३४० | १३५ ९४ ७८९ | २५७ ४३ ६७० | ६८९ ३५ २६७ | २३८ ३८ १७० | ● |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| १६९ ६७ २६९ | १७८ ६२ २२८ | ६८९ ३९ २७० | २४४ ०४ ६८० | ६८९ ३२ १३८ | ८०० ८८ २२४ |
| १२६ ९१ ३९९ | १६० ७८ ५६७ | २३० ५१ ५६० | २८० ०४ ३४७ | ५७८ ०६ ३५८ | १३९ ३५ १६८ |
| ४५५ ४१ १९९ | ४७९ ०३ २३८ | ४६७ ७३ ४९० | ६७० ३९ ४७८ | ७७९ ३९ ३६० | ६६९ १० ५७८ |
| १२६ ९० ५६९ | १७९ ७१ ५६० | १७८ ६९ ४७८ | १४८ ३१ ६६९ | २४० ६५ १६८ | १४६ १३ १३८ |
| २७८ ७८ ४५९ | १५५ ११ ३७९ | २५६ ३९ ९०० | ३३६ २९ १८० | २३५ ०२ १२९ | २८० ०९ ४५० |
| ४६८ ८२ १२९ | ४०० ४० २४४ | १३७ १७ ४४९ | २३९ ४३ २४७ | २७९ ८९ ४७८ | ४७८ ९१ १३७ |
| ४४५ ३५ १४० | १६७ ४३ ३४६ | १६७ ४६ ८८० | ५९० ४२ ५८९ | ३५० ८४ १५८ | १४९ ४७ ५५७ |
| ५९० ४० १२७ | २४६ २५ ६९० | ३५० ८६ ३४९ | २४९ ५७ १६० | ७८९ ४४ १३९ | |

## तांदुळवाडी येथे आगीत पाच गायी जळून होरपळल्या

■ तांदुळवाडी । वार्ताहर

तांदुळवाडी येथे अचानक आगीमुळे चार शेळ्या आगीत भस्म तर पाच गाई जळून होरपडल्या आहे. सध्या वाढत्या उष्णतेच्या लाठे मुळे तालुक्यात तीन ते चार अशा घटना झालेल्या असून तीव्र उष्णतेच्या अग्नी तांडव तांदुळवाडी गावापासून जवळच असलेले शेतामध्ये अशोक पंडित पाटील (५२) शेत शिवार तांदुळवाडी गट नंबर ७४/२/ब/१ यांचे शेतात घर असून त्यांचा पशुपालन व्यवसाय असून घराच्या मागच्या बाजूला पशुधनासाठी पशु गोठ्यात नेहमीप्रमाणे चार शेळ्या व पाच गाई यांना चारापाणी करून नेहमीप्रमाणे गावात आले सुमारे दुपारी २ वाजेच्या दरम्यान अचानक आगीमुळे चार शेळ्या पूर्णपणे भस्म होऊन तर एक गाय ९०% भाजलेली तर चार गायी चाळीस ते पन्नास टक्के होरपडल्या असून, तेथून नागरिकांनी आरडाओरडा करून आग विझवण्याचा प्रयत्न केला पण पाच शेंड्या अंदाज किंमत पंचवीस हजार व गाईंची अंदाजे किंमत एक लाख ८० हजार पर्यंत चारा व कुट्टी पंचवीस हजारा पर्यंत नुकसान झालेले आहे. घटनास्थळी तलाठी करण कुलकर्णी, कोतवाल कविता मॅडम, पोलीस पाटील



किरण बागुल, तंटामुक्तीचे अध्यक्ष जयवंतराव पाटील, यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली जवळील कजगाव येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर स्नेहल चांदलकर यांनी घटनास्थळी येऊन तात्काळ उपचार सुरू करण्यात आले

अशा काही मोठ्या नुकसानीमुळे अशोक पंडित पाटील हे राब राब कष्ट करणारे पशुपालन व शेतकरी यांना अचानक मोठा नुकसानीचा धक्का बसल्याने त्यांची तब्येत स्तब्ध झाली होती. गावकऱ्यांनी धीर दिला. पाचोरा येथील अग्निशामक दल काही क्षणातच तांदुळवाडी गावात दाखल...!

अग्नीचे अचानक आग लागल्याने अग्नीचे रहस्य कळू शकत नाही.

## निधन वार्ता



### संजय तमखाने

**पिंपळनेर। वार्ताहर ।** येथील संजयनगर मधील रहिवासी संजय राजाराम तमखाने (वय ५२ ) यांचे दि.२४ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, मुलगी असा परिवार आहे.


# क्लासिफाईड

## विकणे आहे

धुळे शहरातील नकाणे रोडवरील माहेश्वरी सोसायटी, प्लॉट नं.२४ येथील ८५० स्क्वे.फु. जागा विकणे आहे. संपर्क - रमेश गंगाराम साळवे मोबा. ७०६६५ ५९४५५ (दि.२७/५/२४)


**शुक्रवार २४/०५/२०२४**
मधुर नाईट -१३९-३१-१२८
धनलक्ष्मी नाईट -१४५-०९-३६०
मेन बाजार -३४७-४६-३३०
मिलन ना.-७८९-४३-१३९

**शनिवार २५/०५/२०२४**
मधुर मॉर्निंग-६९०-५६-१५०
मधुर डे-१३३-७७-३५९
मधुर नाईट-३३५-१
धनलक्ष्मी डे-१४८-३२-२४६
धनलक्ष्मी नाईट-३४५-२
मेन बाजार -
कल्याण-३४७-४२-१४७
मिलन डे -२३८-३८-१७०
मिलन ना.-


## दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ. पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२५)(CRINV-2324JL/CRG00555)

## १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२, www. drpalve nashamuk tikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00554)

## उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघे दुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकन गुनीया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो. नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00556)



## देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/-प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.



## सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.





## शॉर्ट न्यूज

### जो.रा.सिटीचा ९७ टक्के निकाल

■ **धुळे । प्रतिनिधी**

धुळे एज्युकेशन सोसायटीच्या आणि डी. एम. बारी कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावीचा निकाल ९८ टक्के लागला तर विज्ञान शाखेचा निकाल ९८.४४ टक्के लागला. शंतनु सतीश वासनेला ८१ टक्के, प्रेरणा संभाजी चव्हाण, रितिका अर्जुन गिरमकर ७५ टक्के गुण मिळवले ,वाणिज्य शाखेचा निकाल ९८.४४ टक्के लागला. अभिलाषा सुनील गर्दे ने ९१.१७ टक्के ,पूनम भगीरथी प्रजापत ने ८९ टक्के ,भाग्यश्री गोकुळ वाघने ८८ टक्के गुण मिळवले, कला शाखेचा निकाल ९५.२ टक्के लागला, शिवा उल्हास सोनारणे ९० टक्के, प्रेरणा रामचंद्र जाधवने ८१.१७ टक्के आणि गौरव एकनाथ जाधवने ७८.५० टक्के गुण मिळवले, शिवा उल्हास सोनार , नमिषा महेश सावंत यांना संस्कृत विषयात शंभर पैकी १०० गुण मिळाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे धुळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रवी बेल पाठक सचिव संतोष अग्रवाल खजिनदार डॉ. मंदार म्हसकर, प्राचार्य अनारसिंग पावरा, उपप्राचार्य पी. एस. कुलकर्णी, सर्व शिक्षक, प्राध्यापक बंधू-भगिनी यांनी अभिनंदन केले आहे.

### संजीवनी महालेचा सत्कार



■ **पिंपळनेर । वार्ताहर**

पिंपळनेर येथील कर्मवीर आनंदराव माणिकराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी कला शाखाची विद्यार्थीनी संजविनी संजय महाले रा. मुक्काम उंबरखेडा पोस्ट धनेर तालुका साक्री ही अतिशय प्रतिकूल व हालाखीची परिस्थिती असताना देखील होस्टेलवर राहून बारावी परिक्षत ७५.८३ टक्के गुण मिळून विद्यालयात कला शाखेमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तिच्या मूळ गावी उंबरखेडा येथे विद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य यांनी तिचा सत्कार केला.

### साक्री पाटबंधारे खात्याला निवेदन



■ **पिंपळनेर । वार्ताहर**

लाटीपाडा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून मौजे देशीरवाडे.ता.साक्री येथे पिण्याच्या पाण्यासाठी पाणी सोडावे यासाठी लघु पाटबंधारे खाते साक्री यांना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यातर्फे निवेदन सादर करण्यात आले. या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते महाराष्ट्र राज्य विधान परिषद अंबादास दानवे यांच्या पत्राद्वारे सूचना देण्यात आले असून अद्याप कार्यवाही झाली नाही. याबाबत दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देण्याच्यावेळी पिंपळनेर शिवसेना तालुका समन्वयक ज्ञानेश्वर पगारे,पिंपळनेर शिवसेना तालुका संघटक तुषार गवळी,साक्री शिवसेना उपतालुका प्रमुख अमोल क्षीरसागर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### पाण्याची टाकी भेट

■ **पिंपळनेर । वार्ताहर**

सध्या उन्हाळ्यात पाण्याची तिव्र समस्या जाणवू लागली आहे.ही बाब लक्षात घेवून धुळे शहरातील उद्योजक निरंजन भतवाल यांनी धुळे तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा रामनगर.(वडेल)येथील विद्यार्थ्यांसाठी पाचशे लिटर पिण्याच्या पाण्याची नवी टाकी उपलब्ध करून दिली. ती टाकी तेथील शिक्षक मनोहर पाटील यांना सुपूर्त करण्यात आली. यावेळी डॉ.ममता सोनवणे,नरेंद्र सोनवणे,गोकुळ देवरे उपस्थित होते.

# १० पेटेंट मिळविणारे डॉ. आशिष पाटील एकमेव डॉक्टर

■ **धुळे । प्रतिनिधी**

नाष्ट्यात वापरल्या जाणाऱ्या सॉसेजचा वापर ऑपरेशनच्या सरावासाठी केला जात आहे, असे सांगितले तर यावर सहजपणे कोणाचाही विश्वास बसणार नाही. पण ही किमया करून दाखविली आहे, मूत्ररोग तज्ज्ञ तथा संशोधक डॉ. आशिष पाटील यांनी.

चिकन सॉजेसचा वापर करून त्यांनी चक्क सॉसेज टीयूआरपी सिम्युलेटर संशोधित आणि निर्मित केली असून नुकतेच त्याला पेटेंटही मिळविले आहे. आता यांच्याकडे एकूण १० पेटेंट झाले असून ते भारतातील दहा पेटेंट मिळविणारे एकमेव डॉक्टर ठरले आहेत.

डॉ. पाटील यांनी प्रोस्टेट ग्रंथींवर अभ्यास केला. गेल्या २२ वर्षांचा अनुभव एकत्रीत करून प्रोस्टेटचे ऑपरेशन व त्यांचा अनुभव नवीन डॉक्टरांना कसा देता येईल यावर विचार केला. नवोदित युरोलॉजिस्टना येणाऱ्या अडचणी बघितल्या. यातून टीयूआरपी सिम्युलेटरची कल्पना सूचली आणि जन्माला आले सॉसेज टीयूआरपी सिम्युलेटर. चिकन सॉसेजसारख्या पदार्थाचा उपयोग सिम्युलेटरमध्ये करता येऊ शकतो, ही कल्पनाही कोणी करू शकत नाही. मोठा विचार करा, असा सल्ला नेहमीच दिला जातो. पण लहानसान गोष्टीही किती महत्वाच्या असतात हे डॉ. पाटील यांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. टीयूआरपी सिम्युलेटरला देशासह विदेशातही मोठ्या प्रमाणात मागणी असून युएई, उजबेकिस्तान, घाणा आदी देशात याचा वापर होत असून देशातील बहुसंख्य शहरांतील मोठी हॉस्पिटल तसेच वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये युरोलॉजिस्ट टीयूआरपी सिम्युलेटरच्या



माध्यमातून प्रशिक्षण दिले जात आहे. विशेष म्हणजे मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया व भारत सरकारने आता सर्जरीच्या विद्यार्थ्यांसाठी सिम्युलेटर ट्रेनिंग अनिवार्य केले आहे.

**टीयूआरपी शस्त्रक्रिया म्हणजे काय**

पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथींची वाढ झाल्याने ती काढण्यासाठी टीयूआरपी शस्त्रक्रिया करतात. टीयूआरपी (ट्रान्स युरेथ्रल रिसेक्शन ऑफ प्रोस्टेट) ही लघवीच्या मार्गाद्वारे दुर्बीण टाकून केली जाणारी शस्त्रक्रिया असून यात प्रोस्टेट ग्रंथीचे बारीक तुकडे करून ते मूत्रमार्गाद्वारे बाहेर काढले जातात. या उपचाराद्वारे मूत्रमार्ग रुंद होतो व लघवी मोकळी होण्यास मदत होते. नवीन तसेच कमी अनुभव असलेल्या डॉक्टर कडून चुका होतात व ऑपरेशन बिघडते. याचा त्रास रुग्णाला कायमस्वरुपी भोगावा लागतो.



**शस्त्रक्रियेत रुग्ण सुरक्षेला प्राधान्य असून, अचूक शस्त्रक्रिया करता येणे हा संशोधनाचा मूळ उद्देश आहे. नवीन युरोलॉजिस्टला प्रत्यक्ष रुग्ण हाताळण्याआधी सराव करता यावा, यासाठीचे हे संशोधन आहे. आणखीन एक पेटेंट मिळाल्याने नवीन संशोधनासाठी ऊर्जा मिळाली आहे.**

**- डॉ. आशिष पाटील**

**सिम्युलेटर म्हणजे काय**

ऑपरेशनचा सराव करता यावा म्हणून तयार केलेले कृत्रिम अवयव म्हणजेच सिम्युलेटर. नवोदित मूत्ररोग तज्ज्ञांना प्रोस्टेट ग्रंथी काढण्याचा सराव करता यावा, थेट रुग्णावर प्रयोग न करता आधी सिम्युलेटरवर सराव करून प्रशिक्षित झाल्यावर रुग्ण हाताळावा यासाठी सॉसेज टीयूआरपी सिम्युलेटरची निर्मिती करण्यात आली आहे. डॉ. पाटील यांनी संशोधित केलेले सिम्युलेटर कमी खर्चिक आहे. तसेच युरोलॉजिस्टला खऱ्याखुऱ्या शस्त्रक्रियेची अनुभूती मिळते, हे विशेष.

**प्रोस्टेट ग्रंथींचा मानवी शरीरात काय उपयोग**

प्रोस्टेट या पौरुषीय प्रजनन ग्रंथी असून विशिष्ट वय संपले की, या ग्रंथीचा शरीरात काही उपयोग नसतो. वयाची पन्नाशी ओलांडलेल्या निम्म्यापेक्षा अधिक पुरुषांना प्रोस्टेट ग्रंथी मोठ्या होण्याचा त्रास होतो. या ग्रंथी वाढल्यास लघवी मोकळी होत नाही. तसेच लघवीची धार बारीक होणे, थेंब- थेंब होणे, घाईची होणे, तुटक होणे, लघवीला जोर द्यावा लागणे, रात्री दोनपेक्षा जास्त वेळा लघवीला जावे लागणे, लघवी अपूर्ण होणे या समस्या उद्भवतात. दुर्बिणीच्या सहाय्याने या मोठ्या झालेल्या प्रोस्टेट ग्रंथी काढून रुग्णांस या समस्येतून मुक्त केले जाते. प्रोस्टेटची शस्त्रक्रिया ही खूप जिकरीची व बारकाईने केली जाणारी शस्त्रक्रिया असते.

# एकाच दिवशी दोघा मित्रांचा मृत्यू

■ **धुळे । प्रतिनिधी**

शहरातील दोघा जिवलग मित्रांचा काल एकाच दिवशी मृत्यू झाला. दोघांचीही प्रकृती ढासळल्यानंतर त्यांना हिरे रुग्णालयात भरती करण्यात आले होते. मात्र, दोघेही काल सायंकाळी उपचारादरम्यान दगावले. दोघांचा मृत्यू हा उष्माघातामुळे किंवा ओल्या पार्टीमुळे झाल्याची चर्चा ऐकण्यास मिळत आहे.

येथील मालेगाव रोडवरील अग्रसेन बिल्डींगमध्ये राहणारा प्रसाद सुधीर घुडे (३६) हा तरुण काल दुपारी १.३० वाजता अवधान एमआयडीसीत कामानिमित्त गेला होता. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता प्रसाद हा एमआयडीसीच्या गेटजवळ चक्कर येवून कोसळला. त्याला काहीजणांनी हिरे रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्या ठिकाणी उपचार सुरु असताना रात्री ८.४० वाजेच्या सुमारास प्रसाद दगावला. तर दुसऱ्या





घटनेत साक्री रोडवरील शनिनगरात राहणारा राकेश रोहिदास पाटील (३६) हा तरुण अवधान एमआयडीसीत गेल्या दोन दिवसांपासून डे- नाईट शिप्ट करत असल्याने घरी आलेला नव्हता. काल सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास हिरे मेडिकल जवळील पाण्याच्या टाकीजवळ राकेश हा बेशुध्दावस्थेत आढळून आला. त्याला मनोहर निकुंभे यांनी हिरे रुग्णालयात भरती केले. त्या ठिकाणी उपचार सुरु असताना सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास डॉ. एजाज यांनी राकेश पाटील याला मयत घोषित केले.

दोघा मित्रांनी केली पार्टी? - प्रसाद आणि राकेश यांची जुनी दोस्ती होती. काल हिरे रुग्णालयातील पाण्याच्या टाकीजवळ दोघांनी सोबतच ओली पार्टी केल्याचे समजते. त्यांना उन्हाची झळ लागल्याने दोघे उष्माघाताचे बळी ठरले असण्याची शक्यता आहे.

दोघा मयताच्या नातलगांनी पोलिसांत खबर दिल्याने अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे. मात्र, दोघांच्या मृत्यूचे नेमके कारण समजू शकलेले नाही. परंतु, एकाच दिवशी दोघा जिवलग मित्रांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

प्रसाद व राकेश हे दोघेही मित्र विवाहित होते. प्रसादला १३ वर्षीय मुलगी असून त्याने प्रेम विवाह केला होता. तर राकेश पाटील याला तीन वर्षीय मुलगा आहे. दोघांच्या अचानक जाण्याने त्यांचा परिवार उघड्यावर आला आहे.

# शवागारमध्ये शवविच्छेदन करण्यासाठी १० मृतदेह

■ **धुळे । प्रतिनिधी**

येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या शवागारात दररोज सरासरी ४-५ मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी दाखल होत असतात. मात्र, हा आकडा अचानकपणे वाढला असून आज तब्बल दहा मृतदेह पीएमसाठी दाखल झाले आहेत.

हिरे रुग्णालयात अत्यवस्थ रुग्ण भरती होत असतात. यापैकी काहींचा मृत्यू अपघाताने, घातपाताने झालेला असतो. संशयास्पद मृत्यू झालेला असल्यास मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात येते. हिरे रुग्णालयाच्या शवागारात दररोज चार ते पाच मृतदेह पीएमसाठी दाखल होत असतात. परंतु, आज त्या ठिकाणी १० मृतदेह पीएमसाठी दाखल आहेत. हा आकडा अचानकपणे का वाढला; हे सांगणे कठीण आहे. मात्र, उष्माघाताचे कोणतेही रुग्ण हिरे रुग्णालयात भरती नाहीत किंवा तशा प्रकारचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आलेले नसल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ.अजित पाठक यांनी दिली आहे.

# डॉ.घोगरे कनिष्ठ महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम



■ **बोराडी । वार्ताहर**

येथील किसान विद्या प्रसारक संस्था संचलित, डॉ. पा.रा.घोगरे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा यंदाही कायम राहिली. विज्ञान शाखा, वाणिज्य शाखेचा निकाल शंभर टक्के तर कला शाखेचा निकाल ९३ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेत चैताली कैलाससिंग चौधरी ८८.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, निशांत प्रशांत जैन ८७.८३ टक्के व साक्षी भूपेंद्र ८७.८३ पटेल टक्के गुण मिळवून द्वितीय तर सानिका हितेंद्रसिंग जमादार ८७.१७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. वाणिज्य शाखेत भूमिका विजय चव्हाण ९३.३३ टक्के गुण मिळवून प्रथम, हिमेश योगेश सोनवणे ९२.६७ टक्के द्वितीय तर अथर्व सुमित अग्रवाल ९१.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. कला शाखेत योगिता रमेश पावरा ८३.३३ टक्के प्रथम, मोहिनी नारायण भदाणे ८१.५० टक्के द्वितीय तर रोहित सुरेश कोळी ८१.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.तुषार रंधे, खजिनदार आशाताई रंधे, सचिव निशांत रंधे, नगरसेवक रोहित रंधे, प्राचार्य डॉ.एस.एस.राजपूत, उपप्राचार्य प्रा.व्ही.ए.चव्हाण, पर्यवेक्षक प्रा.आर.के.पाटील यांनी कौतूक केले.

# भगवान गौतम बुद्ध जयंतीनिमित्त कॅण्डल रॅली

■ **धुळे । प्रतिनिधी**

संघशक्ती एक राष्ट्रशक्ती अभियान अंतर्गत लुंबिनी बुद्ध विहार समिती साक्री रोड धुळे तर्फे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ व्या जयंती तसेच भगवान गौतम बुद्ध यांची २५६७ वी जयंतीनिमित्त अभिवादन करून कॅण्डल रॅली काढण्यात आली व खिरदान वाटप करण्यात आले.

सामूहिक बुद्ध वंदना होऊन लुम्बिनी बुद्ध विहार, साक्री रोड, धुळे पासून रॅलीला सुरुवात होऊन भीम नगर येथे भगवान गौतम बुद्ध, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन



करून पुढे शिवतीर्थ जवळील शहीद अब्दुल हमीद स्मारक येथे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून रॅली पुढे मार्गस्थ झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, बस स्टॅन्ड, धुळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून बुद्ध वंदना, सामूहिक शपथ घेऊन खीर दान वाटप करून रॅलीचा समारोप करण्यात आला.

कॅन्डल रॅलीमध्ये रॅलीला सर्व क्षेत्रातील महार बटालियनचे माजी सैनिक, समता सैनिक दल, शहरातील वकिल, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनियर्स, अधिकारी, तरुण- तरुणी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# उष्माघात कक्ष तत्काळ सुरू करा!

## भाजप जिल्हा उपाध्यक्ष सचिन शेवतकर यांची मागणी

■ **धुळे । प्रतिनिधी**

शासकीय नियमानुसार सुसज्ज उष्माघात कक्ष तात्काळ सुरू करावे अशी मागणी भाजप जिल्हा उपाध्यक्ष सचिन शेवतकर यांनी केली आहे.

उत्तर महाराष्ट्रात उष्णतेची लाट कायम असून पारा साधारणता ४४ ते ४५ अंश सेल्सिअस पर्यंत भिडल्याने अंगाची लाहीलाही होत आहे. सूर्य अक्षरशः आग ओकत असताना उन्हाच्या प्रकोपामुळे सर्वसामान्य जनता उष्माघाताने बळी पडत आहे. एवढी विदारक स्थिती असतानाही प्रशासनाने अद्याप ठोस पावले उचललेले दिसून येत नाही. फक्त



नावालाच उष्माघात कक्ष सुरू केला आहे. या उष्माघात कक्षा बाबत अपघात वार्डातील सीएमओ व इतर कर्मचारी यांना सुद्धा काहीच माहित नाही ही बाब अत्यंत गंभीर आहे.

आपल्या अधिनिस्त सर्वोपचार रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी दुपारी एसीची थंड हवा खातात आणि रुग्ण मात्र हैराण होतात. रुग्णांना पाणी नसल्याने सर्व स्तरावर अडचणी निर्माण होत आहे. तरी हॉस्पिटल प्रशासनाने त्वरित शासकीय नियमानुसार सुसज्ज उष्माघात कक्ष सुरू करून उष्मघातामुळे रुग्णांना होणारा त्रास कमी करावा व उष्णघातामुळे कुठल्याही रुग्णाच्या जीवाचे बरे वाईट होणार नाही याची काळजी घ्यावी. अन्यथा भारतीय जनता पार्टीला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल याची हॉस्पिटल प्रशासनाने नोंद घ्यावी. सदर निवेदन देण्यासाठी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन शेवतकर भाजपा दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष संजय सरग, रुग्णमित्र सुनील विसपुते, अशोक जाधव, कमलाकर महानोर उपस्थित होते.




# देश घडवण्यासाठी सरकार चालवतो!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विरोधकांना टोला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष मुलाखत दिली आहे. यावेळी पंतप्रधान मोदींना धर्माच्या आधारावर आरक्षणाबाबत प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, मुस्लिमांचा मोठा वर्ग देशाच्या विकासाच्या प्रवासात सहभागी नाही. पसमांदा मुस्लिमांना देशाच्या विकासात भागीदार बनवणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे ते म्हणाले.

पंतप्रधानांना विचारण्यात आले की, पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांच्या सरकारने मुस्लिमांना ओबीसी आरक्षण दिले, जे कोलकाता उच्च न्यायालयाने काढून टाकण्यास सांगितले आहे. आरक्षण हे धर्माच्या आधारावर नसावे, असे तुम्ही तुमच्या भाषणातून सांगत आहात. तुम्ही बेंगळुरूमध्ये झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत म्हणाले होते की, भाजपच्या नेत्यांनी त्यांचा संदेश पसमांदा समुदायापर्यंत पोहोचवावा, त्याचवेळी तुमच्या सरकारने तिहेरी तलाक रद्द केला. एकीकडे तुम्ही मुस्लिमांना आरक्षण न देण्याबद्दल बोलत आहात आणि दुसरीकडे तुम्ही हे पाऊल उचलता आहात, यामुळे मुस्लिमांना भाजपकडे आणण्यासाठी समतोल निर्माण होईल असे तुम्हाला वाटते का?

या प्रश्नाला उत्तर देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, हे आपल्या देशाचे दुर्दैव आहे की सरकार चालवणाऱ्यांच्या मनात पुढची निवडणूक जिंकण्यासाठी काही खेळ खेळण्याचा विचार असतो, ही गोष्ट माझ्या मनात राहत नाही. मी पुन्हा सरकार स्थापन करण्यासाठी सरकार चालवत नाही. देश घडवण्यासाठी मी सरकार चालवतो. या सरकारने देशाचे भविष्य घडवावे, या सरकारने देशाच्या भावी पिढीचे भवितव्य घडवावे, मतपेढीनुसार ना मी विचार करतो असेही ते म्हणाले.



**समाजाचे सत्य**

आपल्या देशाचे दुर्दैव हे आहे की तुम्ही लोक टीव्हीवर विश्लेषण करता, बनिया किती, क्षत्रिय किती, ब्राह्मण किती, ढिकणे किती आणि असे किती. यात हिंदू किती टक्के आहेत ते तुम्ही सांगत नाही. मुस्लिमांमध्येही जाती आहेत, पण तुम्हाला त्यांच्याबद्दल माहिती नाही किंवा तुम्ही त्यांच्या जातीचा उल्लेखही करत नाही. याचे कारण असे की, एक उच्च वर्ग आहे ज्याने तिथे ताबा मिळवला आहे, फक्त काही कुटुंबे आहेत ज्यांच्याकडे करार आहेत. खाली शिक्षण नाही. एवढा मोठा वर्ग देशाच्या विकासाच्या प्रवासात भागीदार झाला नाही तर ते देशाचे नुकसान आहे.

माझ्यादेशाच्याविकासाच्यावाटचालीतसमाजातील शेवटच्या घटकालाही सामावून घेतले पाहिजे, हे माझ्या मनात कायम आहे. माझा दृष्टीकोन असा नाही की तो हिंदू असेल तर आपण त्याच्याकडे लक्ष द्यावे, जर तो मुस्लिम असेल तर आपण त्याच्याकडे लक्ष देऊ नये, जर तो हिंदू असेल तर आपण त्याच्याकडे लक्ष देऊ नये, जर तो हिंदू असेल तर आपण त्याच्याकडे लक्ष देऊ नये. मुस्लिम मग आपण त्याच्याकडे लक्ष दिले पाहिजे,

माझे गाव, माझे घर माझे कुटुंब आहे... आजूबाजूची मुस्लिम कुटुंबे, मी मुस्लिम वसाहतीत वाढलो आहे. माझे घर तेथे आहे ते बहुतेक भडभुज आहेत, त्यांची वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळी नावे आहेत. त्याची अवस्था मी पाहिली आहे. त्यामुळे पसमांडा समाजात शिक्षण वाढले पाहिजे, असे माझे म्हणणे आहे. भारताच्या विकासाच्या प्रवासात एवढा मोठा वर्ग भागीदार कसा होऊ शकतो हा माझा विषय आहे.

# सोनिया अन् राहुल गांधींनी मतदान केले पण..

## पहिल्यांदाच 'झाडू' घेतला 'हातात'!



**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात दिल्लीतील सात लोकसभा जागांसाठी मतदान झाले आहे. यावेळची सार्वत्रिक निवडणूक काँग्रेससाठी आणि विशेषत: गांधी कुटुंबासाठी खूप खास आहे. खरे तर, ही पहिलीच वेळ आहे की सार्वत्रिक निवडणुकीत गांधी कुटुंबाने त्यांच्या पक्षाला म्हणजेच काँग्रेसला मतदान केले नाही. सोनिया गांधी, प्रियंका गांधी आणि राहुल गांधी हे दिल्लीचे मतदार आहेत आणि नवी दिल्ली लोकसभा जागेवर आपला मताधिकार वापरतात परंतु या मतदारसंघात आम आदमी पार्टीचा उमेदवार असल्याने व काँग्रेसची आपशी युती असल्याने यावेळी प्रथमच त्यांनी हातात झाडू घेतल्याचे बोलले जात आहे.

गेल्या अनेक सार्वत्रिक निवडणुकांपासून काँग्रेसने या जागेवरून आपला उमेदवार उभा केला आहे. मात्र यावेळी तसे नाही. आम आदमी पार्टी आणि काँग्रेस, इंडियाआघाडीचमित्रपक्ष दिल्लीत एकत्र निवडणूक लढवत आहेत.जागावाटप पद्धतीनुसार आम आदमी पार्टी चार तर काँग्रेस तीन जागांवर निवडणूक लढवत आहे. त्याअंतर्गत नवी दिल्लीची जागा आम आदमी पक्षाकडे आहे. या जागेवरून आम आदमी पक्षाने सोमनाथ भारती यांना उमेदवारी दिली आहे. युतीमुळे काँग्रेसने नवी दिल्ली लोकसभा मतदारसंघातून आपला उमेदवार उभा केलेला नाही.२०१४ आणि २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने दिल्लीच्या सर्व सात जागा मोठ्या फरकाने जिंकल्या होत्या आणि सलग तिसऱ्यांदा सर्व जागा जिंकण्याचे त्यांचे लक्ष्य आहे. ईशान्य दिल्लीतून भाजपने मनोज तिवारी यांना उमेदवारी दिली आहे.

दिल्लीतील ते एकमेव विद्यमान खासदार आ-हेत ज्यांना पक्षाने पुन्हा उमेदवारी दिली आहे. याशिवाय पक्षाने दक्षिण दिल्लीतून रामवीर सिंग बिधुरी, नवी दिल्लीतून बन्सुरी स्वराज, पूर्व दिल्लीतून हर्ष दीप मल्होत्रा, उत्तर पश्चिम दिल्लीतून योगेंद्र चंडोलिया, चांदनी चौकातून प्रवीण खंडेलवाल आणि पश्चिम दिल्लीतून कमलजीत सेहरावत यांना उमेदवारी दिली आहे.

# ईव्हीएम वापरणारा भारत पहिला देश

## जगाला दाखवला डिजिटल लोकशाहीचा मार्ग

**नवी दिल्ली । प्रतिनिधी -**

देशात सध्या निवडणुकीचे वातावरण आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा सहवा टप्पा पूर्ण झाला आहे. सातव्या टप्प्याचे मतदान १ जून रोजी होणार आहे. मतदार, उमेदवार आणि ईव्हीएम या तीन गोष्टींबद्दल निवडणुकीमध्ये बरीच चर्चा होते. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असण्यासोबतच, निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे विकसित करणारा आणि वापरणारा भारत हा पहिला देश आहे. केरळमध्ये प्रथमच ईव्हीएमचा वापर करण्यात आला.१९ मे १९८२ रोजी केरळमधील उत्तर परावूर मतदारसंघात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरण्यात आले. हा एक पायलट प्रोजेक्ट होता. ८४ पैकी ५० मतदान केंद्रांवर प्रथमच सुरक्षित डायरेक्ट डिजिटल व्होट रेकॉर्डिंग यंत्राचा वापर करण्यात आला. अमेरिका-आधारित थिंक टँक अटलांटिक कौन्सिलच्या आकडेवारीनुसार, जवळजवळ एक दशकानंतर १९९० मध्ये, नेदरलँड्स ईव्हीएमची चाचणी करणारा जगातील दुसरा देश बनला.

ईव्हीएम आणि भारताचा एक मनोरंजक इतिहास आहे. ते माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीच्या खूप आधीपासून आले आहेत.



### दोन सरकारी कंपन्या ईव्हीएम करतात तयार

देशांमध्ये, इलेक्ट्रॉनिक मतदान उपकरणे खाजगी कंपन्यांद्वारे स्थापित केली जातात. भारतात ईव्हीएम बनवण्याचे काम दोन सरकारी कंपन्यांकडे आहे. बेंगळुरू-आधारित भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड आणि हैदराबाद-आधारित इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड आ-हेत.अमेरिका, जगातील सर्वात हाय-टेक देश, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या विविध प्रकारांचा वापर करतो.

आयबीएमने भारताला ईव्हीएम मिळण्याच्या काही काळापूर्वीच पर्सनल कॉम्प्युटर आणले होते. भारताने शून्याचा शोध फार पूर्वी लावला आहे. परंतु अलीकडेच १९८२ मध्ये, भारताने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये शून्य आणले, असे एक संचालक म्हणतात जे ईव्हीएम तंत्रज्ञानाची रचना आणि सुरक्षितता बनले आहे.भारत ही लोकशाहीची जननी आहे आणि आज डिजिटली सशक्त लोकशाही, भारत आहे. सुरक्षित मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरण्यात आघाडीवर आहे.

**या देशांमध्ये ईव्हीएमचा वापर**

भारतासह सुमारे २५ देश सध्या डिजिटल मतदानाचा वापर करतात. भारतीय निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, ईव्हीएम वापरणाऱ्या देशांमध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, बल्गेरिया, इटली, स्वित्झर्लंड, कॅनडा, मेक्सिको, अर्जेंटिना, ब्राझील, चिली, पेरू, व्हेनेझुएला, नामिबिया, नेपाळ, भूतान, आर्मेनिया आणि बांगलादेश यांचा समावेश आहे. जागतिक स्तरावर डिजिटल मतदानाचे अनेक प्रकार आहेत. भारतासारख्या काही देशांमध्ये मतदान पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक आहे. तर असे देश आहेत जिथे केवळ मतांची मोजणी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने केली जाते. दुसरीकडे, एस्टोनियासारख्या काही देशांनी इंटरनेट आधारित अंतर मतदानाचा वापर सुरू केला आहे. तर काही देशांमध्ये, मतदान निश्चित मतदान केंद्रांवर केले जाते. या दरम्यान, ऑप्टिकल स्कॅनर देखील वापरला जातो.

# प्रियंका गांधींच्या मुलांनी केले मतदान

## मिराया आणि रेहान वाड्रा पोहोचले मतदान केंद्रावर

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांची मुलगी मिराया आणि मुलगा रेहान वाड्रा यांनीही मतदानाचा हक्क बजावला. मतदानासाठी आलेल्या मिराया वड्रा म्हणाल्या की, मला एवढेच सांगायचे आहे की लोकांनी घराबाहेर पडून मतदान करावे. परिवर्तनासाठी मतदान केले पाहिजे. यावेळी त्यांची आई प्रियांका वढेरा, वडील रॉबर्ट वाड्रा आणि मामा राहुल गांधीही उपस्थित होते. प्रियंका गांधी वाड्रा आणि रॉबर्ट वाड्रा यांच्या मुलांबद्दल फार कमी लोकांना माहिती आहे.

मिराया वड्राबद्दल बोलायचे झाले तर सार्वजनिक जीवनात तिच्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. पण अलीकडच्या काळातील सोशल मीडिया पोस्ट पाहिल्यास त्याच्या आयुष्याशी संबंधित काही रंजक गोष्टी समोर येतात. तसेच, मिराया एक उत्कृष्ट बास्केटबॉल खे-ळाडू आहे. अनेक स्पर्धांमध्येही भाग घेतला आहे. मिराया देखील स्वतःला निसर्गाच्या खूप जवळची समजते. त्यांना अशा ठिकाणी जायला आवडते जिथे त्यांना कोलाहलापासून दूर निसर्गाचे सौंदर्य अनुभवण्याची संधी मिळेल. मिरायाप्रमाणेच तिचा भाऊ रेहान वाड्रालाही निसर्गाच्या सानिध्यात राहायला आवडते. यासोबतच तो त्याच्या पेंटिंगसाठीही ओळखला जातो. रेहान वाड्राने त्याच्या चित्रांची अनेक प्रदर्शनेही आयोजित केली आहेत. त्याला वाइल्डलाइफ फोटोग्राफीचीही खूप आवड आहे.


आपणास सांगूया की काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया, राहुल आणि प्रियंका गांधी यांनी शनिवारी दिल्लीत मतदानाचा हक्क बजावला. काँग्रेसचे हे ज्येष्ठ नेते यावेळी आपल्याच पक्षाला मतदान करू शकले नसते, हे विशेष. कारण दिल्लीत काँग्रेसची आम आदमी पार्टीसोबत युती आहे. आणि या आघाडीअंतर्गत नवी दिल्ली लोकसभा जागा आम आदमी पक्षाकडे आहे. मआपफने येथून सोमनाथ भारती यांना उमेदवारी दिली आहे.

# राजीव गांधींच्या मैत्रीमुळे राजेश खन्ना यांनी घेतले होते शत्रुघ्न सिन्हांशी वैर

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

दिल्लीतील नवी दिल्ली लोकसभा मतदारसंघ ही एक जागा आहे ज्याचे प्रतिनिधित्व मोठ्या राजकारण्यांनी केले आहे. यामध्ये अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, सुचेता कृपलानी आणि केसी पंत यांसारख्या नेत्यांचा समावेश आहे. याशिवाय हिंदी चित्रपटांचे पहिले सुपरस्टार राजेश खन्ना यांनीही या जागेचे प्रतिनिधित्व केले आहे. या निवडणुकीसाठी राजेश खन्ना यांनी राजीव व सोनिया गांधींशी असलेल्या जिव्हाळ्यामुळे त्यांचे जिवलग मित्र शत्रुघ्न सिन्हा यांच्याशी वैरही घेतले होते.

भाजपच्या संस्थापकांपैकी एक असलेले लालकृष्ण अडवाणी यांनी १९९१ मध्ये गुजरातमधील गांधीनगर आणि दिल्लीतील नवी दिल्ली या दोन जागांवरून निवडणूक लढवली होती. त्यांनी नवी दिल्लीच्या जागेचा राजीनामा दिला आणि गांधीनगरची जागा स्वतःकडे ठेवली. त्यानंतर १९९२ मध्ये या जागेवर पोटनिवडणूक झाली होती. या पोटनिवडणुकीत काँग्रेसने सिनेस्टार राजेश खन्ना यांना उमेदवारी दिली होती. तर भाजपने शॉटगन म्हणून प्रसिद्ध असलेल्या शत्रुघ्न सिन्हा यांना तिकीट दिले होते. २० मे १९९१ रोजी पोटनिवडणुकीसाठी मतदान झाले. काँग्रेस नेते आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी त्यांच्या पत्नी सोनिया गांधी यांच्यासोबत दिल्लीतील निर्माण भवनमध्ये मतदान केले होते, त्यावेळी राजेश



खन्ना त्यांना मदत करण्यासाठी उपस्थित झाले होते. कदाचित हे चित्र राजीव गांधींचे दिल्लीतील शेवटचे छायाचित्र असावे. दुस-याच दिवशी तामिळनाडूतील श्रीपेरुंबदूर येथे राजीव गांधींची हत्या झाली होती.१९९१ च्या निवडणुकीत लालकृष्ण अडवाणी यांच्या विरोधात राजेश खन्ना काँग्रेसचे उमेदवार होते. अडवाणींकडून त्यांचा अवघ्या १५८९ मतांनी पराभव झाला. पण पोटनिवडणुकीचे निकाल आले तेव्हा त्यांनी भाजपचे उमेदवार शत्रुघ्न सिन्हा यांचा २७ हजारांहून अधिक मतांनी पराभव केला होता. राजेश खन्ना यांनी ही पोटनिवडणूक जिंकली पण मैत्रीच्या किंमतीवरवच ती होती. ही जागा १९५१ मध्ये स्वातंत्र्यानंतरच अस्तित्वात आली. या जागेवर एकूण १० विधानसभा मतदारसंघ येतात. यामध्ये नवी दिल्ली, करोल बाग, पटेल नगर, मोती नगर, दिल्ली कँट, राजेंद्र नगर, कस्तुरबा नगर, मालवीय नगर, आर-के पुरम आणि ग्रेटर कैलाश यांचा समावेश आहे. स्थापन झाल्यापासून या जागेसाठी १९ निवडणुका झाल्या आ-हेत. यापैकी १० वेळा भाजपने या जागेवर चार वेळा महिलांचे प्रतिनिधित्व केले आहे.

# देशात सरकार कोणाचे येणार?

## योगेंद्र यादव अन् प्रशांत किशोरांचे वाक्‌युद्ध



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीच्या २०२४ च्या सहाव्या टप्प्यासाठी सुरू असलेल्या मतदानादरम्यान, योगेंद्र यादव यांनी निवडणुकीशी संबंधित त्यांचे अंतिम मूल्यांकन शेअर केले आहे. या मुल्यांकनादरम्यान त्यांनी यावेळी भारतीय जनता पक्ष आणि त्यांचा मित्रपक्ष एनडीएला किती जागा मिळतील हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय राजकारणाचे चाणक्य म्हटल्या जाणाऱ्या प्रशांत किशोर यांनी राजेंद्र यादव यांचे हे निवडणूक आकलन सोशल मीडियावर शेअर केले आहे. नुकतेच प्रशांत किशोर यांनी दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले होते की, दे-शात पुन्हा एकदा मोदी सरकार येणार आहे. त्यामुळे या दोघांमध्ये पुन्हा एकदा वाक्‌युध्द रंगले आहे. योगेंद्र यादव यांनी केलेले लोकसभा निवडणुकीचे मूल्यमापन शेअर करताना प्रशांत किशोर म्हणाले की योगेंद्रजींच्या मते, भाजपला २४०-२६० जागा मिळू शकतात आणि मित्रपक्षांना ३५ते ४० जागा मिळू शकतात. देशात तिसऱ्यांदा भाजपचे सरकार स्थापन होणार आहे. यात शंका नाही. भाजप आणि विशेषत: पंतप्रधान नरेंद्र यांनी अतिशय हुशारीने काँग्रेसला त्यांच्या रणनीतीत अडकवले. मात्र, खरा निकाल ४ जूनलाच देशाला कळेल.

# ओडिशात लोकसभा अन् विधानसभेच्या निवडणुका एकत्र, मतदारांनी बजावला हक्क



**मतदार**

**ओडिशा ।** ओडिशामध्ये लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका एकत्र होत असून त्यासाठी दिनांक २५ रोजी सहाव्या टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी मतदारांनी घराबाहेर पडत आपल्या मतदानाचा हक्क बजावला. भुवनेश्वरसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये उत्साहात मतदान झाले. यावेळी महिलांनीदेखील लोकशाहीच्या या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले कर्तव्य पार पाडले. याची झलक एका मतदान केंद्रावर झालेल्या या गर्दीतून दिसत आहे.

## सीमा सुरक्षित असत्या तर वेगाने प्रगती झाली असती!



**मुंबई ।** भारताच्या सीमा अधिक सुरक्षित, परिभाषित असत्या आणि प्रतिकूलपणे हिसकावून घेतल्या गेल्या नसत्या तर भारताने अधिक वेगाने प्रगती केली असती अशी टीका राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी केली. गेल्या १० वर्षांमध्ये देशाची ताकद प्रचंड वाढली असल्याचा दावाही त्यांनी केला. ते सीमा सुरक्षा दलाच्या२१व्या पदप्रदान समारंभाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रुस्तमजी स्मृती व्याख्यानात बोलत होते. डोभाल म्हणाले की, सीमा महत्त्वाच्या असतात कारण त्या आपली स्वायत्तता परिभाषित करतात. नजीकच्या भविष्यात, गतिमान आर्थिक विकासासाठी आपल्या सीमा जितक्या सुरक्षित असायला हव्यात तितक्या त्या असतील असे मला वाटत नाही. त्यामुळे सीमा सुरक्षा दलांची जबाबदारी मोठी आहे. त्यांनी २४ तास सतर्क राहणे आवश्यक असते. त्यांना आपले राष्ट्रीय हितसंबंध आणि देशाचे संरक्षण करणे आवश्यक असते.जी जमीन आपल्या ताब्यात असते तीच आपली असते, बाकी न्यायालयांचे काम असते आणि त्याने काही फरक पडत नाही असेही डोभाल यांनी नमूद केले.

# देवाला जे मान्य असेल ते होईल!

## केजरीवालांच्या वडिलांची मतदानानंतर प्रतिक्रिया

**नवी दिल्ली ।** लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी मतदानझालेआहे. दिल्लीतील सर्व ७ जागांवरही मतदान झाले आहे. या लोकसभा निवडणुकीत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे राजकीय भवितव्यही धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत अरविंद केजरीवाल यांच्या वडिलांनी आम्ही कोणालाच आवाहन करणार नाही. आमच्यात तेवढी ताकद नाही, म्हणून आम्ही हात फिरवतो. पण देवांच्या मनात असले तसेच होईल असे त्यांच्या वडिलांनी मतदान करतांना म्हटले आहे.

अरविंद केजरीवाल यांचे भवितव्यही या निवडणुकीवर अवलंबून आहे, असे त्यांच्या वडिलांना विचारले असता ते म्हणाले की, देवाला जे मंजूर असेल तेच घडेल. आम्ही फक्त यावर विश्वास ठेवतो. प्रत्येकाला देवावर विश्वास ठेवण्यास सांगितले आहे. अरविंद केजरीवाल यांना दडपून त्रास दिला जात असल्याचा आरोप केला जात आहे. अरविंद केजरीवाल यांचे वडील गोविंद राम म्हणाले की,काम करणाऱ्याची स्वतःची गती असते, त्याची स्वतःची गती असते.

लोकसभा निवडणुकीमुळे दिल्लीत मतदान संथ आहे आणि अनेक ठिकाणी मशिन बिघडल्याचा



आरोप मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि आम आदमी पक्ष सातत्याने करत आहेत. दिल्लीतील संथ मतदानाबाबत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल म्हणाले की, निवडणूक आयोगाने दिल्लीत सुरळीत मतदान व्हावे.

मंत्री आतिशी म्हणाले की आम्हाला अधिकृत माहिती मिळाली आहे की काल संध्याकाळी एलजीने दिल्ली पोलिस अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती आणि भारत आघाडीचा गड असलेल्या भागात मतदान कमी करण्याच्या सूचना दिल्ली पोलिसांना देण्यात आल्या होत्या. असे झाल्यास ते मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांचे उल्लंघन ठरेल. त्यामुळे निवडणूक आयोग याची दखल घेईल, अशी आशा आहे. लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात २५ मे रोजी दिल्ली, हरियाणा, ओडिशा, जम्मू-काश्मीर, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंडमध्ये मतदान होत असून निवडणुकीचे निकाल ४ जून रोजी जाहीर होतील.

## मतदान सुरु असतानाच आमदाराचे निधन




**नवी दिल्ली ।** देशातील सहाव्या टप्प्यात सकाळपासून मतदानाला सुरुवात झाली. राजधानी दिल्ली, हरयाणासह ८ राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशात आज मतदान होत असतांना, एक दुःखद बातमी समोर आली आहे.गुरुग्राममधील अपक्ष आमदार राकेश दौलताबाद यांचं निधन झालं आहे. बादशाहपूर विधानसभा मतदारसंघातून ते अपक्ष म्हणून निवडून आले होते. आज सकाळी त्यांना हृदयविकाराच तीव्र झटका आला, त्यामध्ये त्यांचे निधन झाल्याची दुर्दैवी घटना घडली. आमदार राकेश हे ४५ वर्षांचे होते. राकेश यांना सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्यांना दिल्लीतील खासगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पालम विहार येथील मणिपाल रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## मतदान करताना एस. जयशंकर चुकले

**नवी दिल्ली ।** लोकसभेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत दिल्लीच्या ७ जागांवर मतदान झाले आहे. यादरम्यान केंद्रीय मंत्री एस. जयशंकर यांच्यासोबत एक विचित्र घटना घडली. मतदानासाठी ते केंद्रावर पोहोचले असता तेथे त्यांचे नाव आढळून आले नाही. त्यानंतर दुसऱ्या केंद्रावर जाऊन मतदान केले.

दिल्लीतील मतदान केंद्रावर परराष्ट्र मंत्री एस जयशंकर पोहोचले आणि मतदानाच्या रांगेत जवळपास २० मिनिटे उभेही राहिले, पण त्यांना त्या ठिकाणी मतदानच करता आलं नाही. मतदान न करताच त्यांना घरी जावं लागलं आणि घरी जाऊन तपास केला असता त्यांचे मतदान केंद्र वेगळं असल्याचं समोर आलं. नंतर त्यांनी दुसऱ्या मतदान केंद्रावर जाऊन आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

लोकसभेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत दिल्लीच्या ७ जागांवर मतदान होत आहे. पण काहींचे मतदान यादीत नावच नाही, काहीचे दुसऱ्याच ठिकाणी मतदानात नाव असणे असं अनेक ठिकाणी घडल्याचं दिसून आलं. केंद्रीय मंत्री एस. जयशंकर हेदेखील यातून सुटले नाहीत. दिल्लीतील तुघलक लेनमधील अटल आदर्श शाळेत जयशंकर हे सकाळी मतदानासाठी गेले




होते. यावेळी ते मतदानासाठी सुमारे २० मिनिटे रांगेतही राहिले. मात्र त्यांचे नाव मतदार यादीत नसल्याचं समोर आलं. नंतर त्यांनी घरी येऊन पुन्हा तपासणी केली. त्यानंतर अन्य कोणत्यातरी केंद्रावर त्यांचे नाव आढळून आल्याने त्यांनी तेथे पोहोचून मतदानाचा हक्क बजावला.

नवी दिल्लीतील लोकसभा मतदारसंघ-०४ मतदान केंद्र क्रमांक-५३ येथे एस जयशंकर यांनी मतदान केलं. त्या मतदानकेंद्रावर मतदान करणारे ते पहिलेच पुरुष ठरले. तशा प्रकारचे प्रमाणपत्रही नवी दिल्लीच्या जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या वतीने त्यांना देण्यात आलं. स्वत: केंद्रीय मंत्र्यांनी प्रमाणपत्रासह त्यांचे छायाचित्र सोशल मीडिया साइट द वर पोस्ट केले आहे.

# भाजपा उमेदवाराच्या ताफ्यावर हल्ला

**कोलकता ।** पश्चिम बंगालमधील झारग्राम लोकसभा मतदारसंघात मतदानादरम्यान भाजपा उमेदवार प्राणनाथ टुडू यांच्या ताफ्यावर हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, प्राणनाथ टुडू यांच्या गाडीवर विटा फेकण्यात आल्या. तसेच, केंद्रीय सुरक्षा दलांवरही हल्ला झाल्याचा आरोप आहे. गडबेटा येथे प्राणनाथ टुडू यांच्या गाडीवर झालेल्या हल्ल्यात दोन सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. तर त्यांच्या डोक्याला दुखापत झाली आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दुसरीकडे तृणमूल काँग्रेसने आरोप केला आहे की, भाजपा परिसरात अशांतता पसरवत आहे. काही मतदान केंद्रांवर भाजपा एजंट्सना प्रवेश दिला जात नसल्याच्या तक्रारी पाहता प्राणनाथ टुडू हे गडवेटाला जात असताना ही घटना घडली. अचानक काही लोकांनी रस्ता अडवण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान काही टीएमसीच्या गुंडांनी गाडीवर विटा फेकण्यास सुरुवात केली, असा दावा प्राणनाथ टुडू यांनी केला. यावेळी त्यांच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता ते जखमी झाले. त्यांच्यासोबत असलेल्या दोन सीआयएसएफ जवानांच्या डोक्याला दुखापत झाली. त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले, असे प्राणनाथ टुडू यांनी सांगितले.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त परिसरात पाठवण्यात आला होता. दुसरीकडे, याबाबत स्थानिक टीएमसी नेतृत्वाने आरोप नाकारले आणि प्राणनाथ टुडू यांच्यावर शांततापूर्ण मतदान प्रक्रिया बिघडवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. स्थानिक टीएमसी नेत्याने सांगितले की, भाजपाचे उमेदवार मतदारांना धमकावत आहेत. त्यामुळे ग्रामस्थ संतप्त झाले आणि त्यांनी आंदोलन केले. दरम्यान, जमावाकडून विविध माध्यमांच्या वाहनांचीही तोडफोड करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. भाजपा उमेदवाराच्या विरोधात मगो बॅकच्या घोषणा मोगलापाटा हे गाव झारग्रामच्या गडवेटा विधानसभा मतदारसंघात आहे. प्राणनाथ टुडू या परिसरात येताच जवळपास दीड ते दीडशे ग्रामस्थांनी त्यांना घेराव घातला आणि गो बॅकच्या घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यानंतर अचानक विटा आणि दगडफेक करण्यात आली. परिस्थिती इतकी गुंतागुंतीची बनली की, प्राणनाथ टुडू यांच्यासोबत असलेल्या सुरक्षा रक्षकांनाही ती हाताळता आली नाही.

# ईव्हीएमचे महाराष्ट्रात व्हायरल व्हिडिओ जुने; निवडणूक आयोगाने केले स्पष्ट

## खोडकर घटकाकडून निवडणूक प्रक्रिया बिघडवण्याचा प्रयत्न

**कोलकता ।** महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीसाठी मतदान पूर्ण झाले आहे. मतदानानंतर अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत ज्यात ईव्हीएम मशीनमध्ये छेडछाड होताना दिसत आहे.

या व्हिडिओंद्वारे महाराष्ट्रात मतदानादरम्यान ईव्हीएममध्ये छेडछाड झाल्याचे सांगण्यात येत आहे. आता हे व्हिडिओ समोर आल्यानंतर निवडणूक आयोगाने यावर स्पष्टीकरण दिले आहे. हे सर्व जुने असून महाराष्ट्राच्या ईव्हीएमबाबत काहीही झाले नसल्याचे आयोगाने म्हटले आहे. मुख्य निवडणूक अधिकारी म्हणाले, असे निदर्शनास आले आहे की इतर राज्यांतील काही जुने व्हिडिओ सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हायरल होत आहेत, ज्यामध्ये खोडकर घटक निवडणूक प्रक्रिया बिघडवण्याचा प्रयत्न करतात आणि विशेषतः ईव्हीएममध्ये छेडछाड करतात. असे स्पष्ट करण्यात आले आहे की असे व्हिडिओ आहेत. लोकसभा निवडणुकीशी संबंधित नाही. महाराष्ट्रात २०२४ चे मतदान सुरळीत आणि शांततेत पार पडले.

लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान झाले. पाचव्या टप्प्यात येथे सर्वात कमी मतदान झाले. लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा निकाल ४ जून रोजी जाहीर होणार आहे.

महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात लोकसभेच्या पाच जागांवर ५७.८ टक्के मतदान झाले. दुसऱ्या टप्प्यात लोकसभेच्या आठ जागांवर ५९.६ टक्के मतदान झाले. तिसऱ्या टप्प्यात ११ जागांवर ६१.४ टक्के मतदान झाले. त्याचप्रमाणे, चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रातील लोकसभेच्या ११ जागांवर ५९.६ टक्के मतदान झाले. पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यात १३ जागांवर केवळ ४९ टक्के मतदान झाले.

**पवित्र कुरआन - सुराह ३७, आयात ११**
आता यांना विचारा, यांची निर्मिती अधिक कठीण आहे अथवा त्या वस्तूंची ज्या आम्ही निर्माण करून ठेवल्या आहेत? यांना तर आम्ही चिवट मातीपासून निर्माण केले आहे.

**सुराह ४९ आयात१३**
लोकहो, आम्ही तुम्हाला एका पुरुष व एका स्त्रीपासून निर्माण केले आणि मग तुमची राष्ट्रे आणि वंश बनविले जेणेकरून तुम्ही एकमेकांना ओळखावे. वास्तविकत: अल्लाहजवळ तुमच्यापैकी सर्वात जास्त प्रतिष्ठित तो आहे जो तुमच्यापैकी सर्वात जास्त ईशपरायण आहे.... निश्चितच अल्लाह सर्वकाही जाणणारा आणि खबर राखणारा आहे.

**जे.के.पार्क परिवार, नंदुरबार**
**मोफत कुरआन मिळविण्यासाठी संपर्क - ९८९०५६९६५२**







## बोरदला भगवान बुद्धांच्या मूर्तीची स्थापना

**■ बोरद ता.तळोदा । वार्ताहर**

येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त समाजबांधवांकडून बुद्धीविहारात तळोदा तालुक्यातील समाजाचे प्रतिष्ठित नागरिक तथा प्रमुख पाहुणे सुरेश इंद्रजित यांच्या हस्ते भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली.भिकलाल ढोडरे अध्यक्षस्थानी होते.



येथील माजी समाजकल्याण सभापती नरहर ठाकरे,कन्हैयालाल ढोडरे,विनोद सोनवणे, संतोष ढोडरे,लक्ष्मण साळवे,ज्योतिबाई साळवे,शशिकांत सोनावणे,ॲड.बंन्नोजी पिंपळे, बादल जगदेव, शरद सोनावणे, सुनील ढोडरे,बापू ढोडरे यांच्यासह बोरद पोलीस दुरक्षेत्राचे हवालदार गौतम बोराडे तसेच पोलीस नाईक विजय विसावे उपस्थित होते. शरद सोनावणे यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन व आभार राजेंद्र ढोडरे यांनी मानले. यावेळी समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

# बोरद येथील कोंबड्यांचा उष्माघाताने मृत्यू

## पोल्ट्री फार्मला कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट

**■ बोरद ता.तळोदा । वार्ताहर**

उष्माघाताने दोन दिवसापूर्वी बोरद येथील जुल्फेकार तेली व लाखापूर फॉरेस्ट येथील सागर पवार यांच्या पोल्ट्री फार्म मधील साधारणतः चार हजार कोंबड्या मृत पावल्या होत्या. याची सविस्तर बातमी 'दैनिक देशदूत' ने प्रसारित केली. या बातमीची दखल घेत अलिबाग येथील प्रीमियम कंपनीचे एरिया मॅनेजर व सुपरवायझर त्याचबरोबर डॉक्टरांचे पथक या ठिकाणी दाखल झाले. या पथकाने मृत झालेल्या कोंबड्यांचे शवविच्छेदन केले. कोंबड्यांचा मृत्यू उष्माघाताने झाल्याचे सांगण्यात आले.

बोरद येथे वेळावद रस्त्यावर जुल्फेकार तेली यांचे २०१४ पासून व्यवसायानिमित्ताने पोल्ट्री फार्म सुरू केले आहे व लाखापूर फॉरेस्ट येथे सागर दिवाकर पवार यांचे २०१८ पासून पोल्ट्री फार्म सुरू आहे. ३८ डिग्री सेल्सिअस तापमानापर्यंत या कोंबड्या जिवंत राहू शकतात.



परंतु या वर्षी सहा दिवसापासून ४१ वर तापमान वाढल्याने यात कोंबड्यांचे मृत्यूचे प्रमाण देखील वाढू लागले आहे. साधारणता या दोन दिवसातच दोन्ही पोल्ट्री फॉर्म मिळून चार हजार कोंबड्या मरण पावल्या. याबाबत दैनिक देशदूतमध्ये वृत्त प्रसारित होताच अलिबाग कंपनी येथून आपल्या एरिया मॅनेजर यांच्याशी संपर्क करण्यात आला व त्यांना तातडीने बोरद व लाखापूर या ठिकाणी भेट देण्यास सांगण्यात आले. बोरद व लाखापूर येथे हे पथक दाखल झाले. त्यांनी कोंबड्यांचे विच्छेदन केले असता कोंबड्या उष्माघाताने मरण पावल्याचे त्यांनी जाहीर केले.

> मृत कोंबड्यांना खड्डा खोदून बुजविण्यास सांगून जिवंत कोंबड्यांना आजपासून घेऊन जाणार असल्याचे मालक-यांनी सांगितले.
>
> **- झुल्पिकार तेली**
> पोल्टी फार्म मालक

# बिबट्याचा शेळ्यांवर हल्ला

### केवडीच्या गोडांपादरपाडा येथील घटना; आठ शेळ्यांचा मृत्यू

**■ मोलगी । वार्ताहर**



अक्कलकुवा तालुक्यातील केवडीच्या गोडांपादरपाडा येथे गुरुवार दि.२३ रोजी रात्री बारा वाजेच्या सुमारास गवल्या तुरका तडवी यांच्या कामडीच्या घरात शेळया बांधलेल्या असताना बिबट्या दोन पिलासह प्रवेश करीत दहा शेळ्यावर हल्ला करीत जखमी केला होता.

यावेळी शेळयाच्या आरडाओरड सुरू असल्याने मालक गवल्या तडवी यास जाग आल्यावर बघीतल्यावर त्याने देखील आजुबाजुच्या घरातील लोकांना आरडाओरड करून मदतीला हाक मारल्यावर घराजवळील इतर लोक धावुन आल्यावर बिबट्या व त्यांच्या दोघ पिल तेथून प्रसार झाले होते.

यावेळी घरात चाळीस पाळीव शेळ्या बांधलेल्या होत्या. यात बिबट्याच्या हल्ल्यात दोन जागीच मृत व आठ जखमी मानेत दुखापती अवस्थेत सकाळी दिसुन आल्या होत्या.

या जखमी झालेल्या आठ शेळ्या देखील गुरूवार दुपारपर्यंत दगावल्या होत्या.

## नंदुरबारातून मोटारसायकल लंपास

**नंदुरबार । प्रतिनिधी**

महाविद्यालयाजवळून दुचाकी चोरीला गेल्याची घटना नंदुरबार येथे घडली. याप्रकरणी अनोळखीविरूध्द नंदुरबार उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नंदुरबार येथील कल्याणी पार्कमध्ये राहणारे प्रा.विजय साहेबराव सौंदाणे यांनी जिजामाता गेटसमोर दुचाकी (क्र.एम.एच.३९-एम.२५१७) उभी केली होती. चोरट्याने सदरची दुचाकी चोरून नेली आहे. याबाबत प्रा.विजय सैंदाणे उपनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# शहादा येथे रोहित्राला लावली जाते 'कूलिंग सिस्टिम'



**■ शहादा । ता.प्र.**

दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. ४० ते ४५ अंशावर तापमानाच्या पारा जात आहे. या वाढत्या तापमानात माणसाला थंड वातावरणाची गरज असते. त्याप्रमाणेच विद्युत पुरवठा करणाऱ्या रोहित्रांनाही वाढत्या तापमानाचा फटका बसून वीज पुरवठा खंडित होऊ नये यासाठी प्रत्येक रोहित्राला विज वितरण कंपनी तर्फे स्वतंत्र कुलिंग सिस्टीम लावण्यात आली आहे.

दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. असह्य झालेले तापमान नियंत्रित करण्यासाठी कुलर, एसी सारख्या साधनांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. उन्हाळ्यामध्ये विजेची मागणी जास्त असते. त्यामुळे सुरळीत व अखंड वीज पुरवठा व्हावा यासाठी वीज वितरण कंपनीकडून काळजी घेतली जाते. विजेची वाढती मागणी त्याचबरोबर तापमानातील वाढ यामुळे विद्युत पुरवठा करणाऱ्या रोहित्रांवर अतिरिक्त भार येतो. शिवाय अतिउष्णतेमुळे रोहित्रांमध्ये बिघाड होण्याची शक्यता दाट असते.

त्यामुळे येथील येथील प्रकाशा रस्त्यावर असलेल्या वीज वितरण केंद्राचा २२० शहादा उपकेंद्रावरील रोहित्रांना कुलिंग सिस्टीम लावण्यात आली आहे. ही कूलिंग सिस्टीम स्वयंचलित असून एका विद्युत रोहित्राला दहा कुलिंग फॅन असतात. त्यात दोन पंखे अतिरिक्त असून आठ पंखे सतत रोहित्राचे तापमान नियंत्रित करीत असतात. बाहेरील तापमान वाढल्यास हे स्वयंचलित कूलिंग फॅन आपोआप सुरू होऊन रोहित्राचे तापमान नियंत्रित करतात.

> २२० शहादा उपकेंद्र हे ३७५ एम व्ही ए कपॅसिटीचे आहे. नंदुरबार जिल्ह्यातील सर्वात मोठे शहादा उपकेंद्र आहे. ९० टक्के नंदुरबार जिल्ह्यातील विजेच्या भार हा या उपकेंद्रावर आहे. शहादा उपकेंद्रात काही तांत्रिक बिघाड झाल्यास जवळपास ९० टक्के नंदुरबार जिल्हा हा अंधारात राहण्याची शक्यता असते. यासाठी शहादा उपकेंद्रात दररोज तांत्रिक कामे केली जातात. कंपनीतर्फे ग्राहकांना अधिकाधिक चांगल्या सोयी सुविधा देण्याचा प्रयत्न सुरू असतो. सुरळीत वीज पुरवठा व्हावा यासाठी नियोजनबद्ध आखणी करून दररोज उपकेंद्रात तांत्रिक कामे केली जातात.
>
> **- गणेश पाटील**
> अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकेंद्र शहादा.

# शहादा पालिकेतर्फे ७० प्लास्टिक जप्त

**■ शहादा । ता.प्र.**

शहादा पालिकेतर्फे शहरात प्लास्टिक निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. यावेळी नगरपालिकेचा पथकाने मुख्याधिकारी दिनेश सिनारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्लॅस्टिक कॅरी बॅग वापर करणाऱ्यांवर विविध ठिकाणी कारवाई करत सुमारे ७० किलो प्लास्टिक कॅरी बॅग जप्त केल्या.

शासनाच्या प्लॅस्टिक बंदीच्या अंमलबजावणीसाठी शहादा पालिकेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशान्वये शहादा नगरपालिकेच्या प्लॅस्टिक बंदी पथकाने शहरात प्लॅस्टिकचा वापर करणाऱ्या दुकानांवर अचानक धाड टाकली. त्यात महात्मा गांधी पुतळा परिसर, भाजी मंडी परिसर, टॅक्सी स्टैंड परिसर, दोंडाईचा रोड, मेन रोड आदी ठिकाणी दुकानामध्ये प्लॅस्टिक कॅरि बॅगा आढळून आले. संपूर्ण प्लॅस्टिक जप्त करण्यात आले. सदर जप्त केलेला माल एकूण ७० किलो आहे.

यावेळी पाणी पुरवठा अभियंता तथा पथक सनियंत्रक प्रकाश जावरे, पथक प्रमुख गोटूलाल




तावडे, पथक प्रमुख तथा शहर समन्वयक भूषण सोनार, गणेश मोरे, रहीम बेग, विवेक सोलंकी, विक्रम डोडवे, कमलेश डोडवे, हिमांशु अहिरे, विपुल गोजरे यांचा समावेश होता.

# संत भीमा भोई जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन

**■ नंदुरबार । प्रतिनिधी**



सामाजिक स्तरावर थोर संतांनी दिलेल्या विचारांचे अनुकरण करून संघटन शक्तीतून सामाजिक प्रगती साधावी. संत भीमा भोई यांच्या कार्याची दिशा सर्वांना प्रेरणादायी ठरावी असा सूर मान्यवरांनी प्रतिमा पूजन प्रसंगी व्यक्त केला.

भोई समाजाचे संत शिरोमणी भीमा भोई यांच्या जयंतीनिमित्त नवी भोई गल्ली येथील सामाजिक सभागृहात सकाळी ११ वाजता प्रतिमापूजनाने अभिवादन करण्यात आले. दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन मान्यवरांच्या हस्ते पार पडले. सदरच्या कार्यक्रमात ज्येष्ठ कार्यकर्ते, मोतीलाल मोरे, सुरसिंग मोरे, चंदर खेडकर, रामचंद्र साठे,रमेश मोरे, गणेश वाडीले, सामाजिक कार्यकर्ते संतोष वसईकर, संजय साठे, इंजि. रामकृष्ण मोरे, अँड.प्रकाश भोई, डॉ.गणेश ढोले, राजेंद्र भोई, जितेंद्र खेडकर, सुरेश वाडीले, सुरेश वानखेडे, मोहन ढोले, जगदीश साठे, नीरज मोरे, हेमराज साठे यावेळी मोठया संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# ॲपेरिक्षाच्या अपघातात महिला ठार

**■ नंदुरबार । दि.२७। प्रतिनिधी**

भरधाव वेगातील ॲपेरिक्षाचा अपघात झाल्याने एक महिला जागीच ठार झाल्याची घटना नवागावजवळ घडली तसेच दोन महिला जखमी झाल्या असून याप्रकरणी रिक्षा चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धडगाव तालुक्यातील पिंप्री येथील क्रिष्णा वेस्ता पावरा हा ॲपेरिक्षामध्ये काही जणांना बसूवन धडगाव ते तळोदा रस्त्याने जात होता. भरधाव वेगात असतांना नवागाजवळ ॲपेरिक्षाचा अपघात झाला. या अपघातात अश्विनी सुरेश पवार (३२) रा.रोषमाळ धनखेडीपाउा ता.धडगाव ही महिला जागीच ठार झाली आहे. तसेच कोबीबाई सुकलाल पावरा, बाकीबाई मेरसिंग पावरा रा.आचपा ता.धडगाव या दोघी जखमी झाल्या आहेत.

याबाबत मेंद्रीबाई समरसिंग पावरा यांनी धडगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ॲपेरिक्षा चालक क्रिष्ण वेस्ता पावरा याच्याविरूध्द भादंवि कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मोटरवाहन कायदा कलम १३४, १८७, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक राहुल पाटील करीत आहेत.

## रूखमाबाई खोरे यांचे निधन

नंदुरबार। प्रतिनिधी

शहादा तालुक्यातील ब्राम्हणपुरी येथील रहिवाशी रूखमाबाई सोमजी खोरे(सोनार) (८५) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या हिरालाल, मोतीलाल व सुकलाल खोरे यांच्या आई होत.

## महिलेच्या पर्समधून ४३ हजारांची रोकड लंपास

**■ नंदुरबार । प्रतिनिधी**

मंगळ बाजारात रस्त्याने जाणाऱ्या एका शिक्षीकेच्या पर्सची चैन उघडून ४६ हजाराची रोकड चोरीला गेल्याची घटना नंदुरबार येथे घडली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बागलान तालुक्यातील ताराबाद येथील शितल तुषार साळवे ही महिला शिक्षीका नंदुरबारात आली होती. मंगळ बाजार परिसरातून जात असतांना अनोळखीने या महिलेच्या पर्सची चैन उघडून ४३ हजार रूपयांची रोकड काढून घेतली. याबाबत शितल साळवे या महिलेने नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हे.कॉ. प्रकाश अहिरे करीत आहेत.

# बुद्ध जयंतीनिमित्त खिरदान

**■ नंदुरबार । प्रतिनिधी**

बुद्ध जयंती निमित्त कपिलवस्तु बुद्धविहार येथे वैचारिक कार्यक्रमासह खिरदान करण्यात आले.

नंदुरबार गणेश नगर येथील कपिलवस्तु बुद्ध विहार येथे दरवर्षाप्रमाणे यावर्षी विविध संघटना व समाज बांधवांच्या वतीने बुद्धजयंती निमित्त वैचाररिक कार्यक्रमासह खिरदानाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रतिमाना मान्यवरांनी पुष्पार्पण करुन अभिवादन केले. नंदू बैसाणे सामूहिक बुद्धवंदना म्हटली. भाऊराव बिरारे, सुनील महिरे यांनी मनोगत व्यक्त केले. खिरदान रवि रगड़े यांनी केले. नंदू बैसाने यांनी सूत्रसंचलन केले.

आभार बापू साळवे यांनी मानले. कार्यक्रमाला बापू साळवे, सुनील महिरे, सुभाष पानपाटील, रवि रगडे, भाऊराव बिरारे, नंदू बैसाने, श्रीराम मोरे, विजय वाघ, दिलीप खैरणार, राजेंद्र महाले, सुरेश जावरे, रविशंकर सामुद्रे आदी समाज बांधव महिला वर्ग उपस्थित होते.

## शहादा येथे अर्धवट सांगाडा आढळला ओळख पटविण्याचे आवाहन

**■ नंदुरबार । प्रतिनिधी**

अनोळखी व्यक्तीच्या प्रेताचा अर्धवट सांगाडा मिळून आल्याची घटना शहादा शहरातील रामदेवबाबा नगरातील मोकळया जागेत घडली. त्यात मृतदेहाचा एक डावा हात अर्धवट कुजलेला मिळून आला होता. शहादा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली अयूप मयताची ओळख पटविण्याचे आ वाहन पोलीसांनी केले आहे.

शहादा येथील रामदेवबाबा नगरपरिषद मोकळया जागेमध्ये अनोळखी व्यक्तीचा प्रेताचा अर्धवट सांगाडा मिळून आला आहे. सदर सांगाडयाचे डोक्यचा कवटीचा भाग व दोन्ही पाय अर्धवट कुजलेले त्यात एक काळपट रंगाची पॅन्ट अडकलेली आणि एक डावा हात अर्धवट कुजलेला मिळून आला होता. याबाबत शहादा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्यामकांत पाटील करीत आहेत. या मयत व्यक्तीची ओळख पटविण्याचे आवाहन शहादा पोलीसांनी केले केले आहे.

# शहादा-शिरपूर रस्त्यावर वादळामुळे वृक्ष उन्मळून पडले

## रस्त्यावरील वृक्ष बाजूला करून वाहतूक सुरळीत करावी

**■ शहादा । दि.२५। ता.प्र.**

तालुक्यातील पूर्व भागात आठवडयाभरापूर्वी जोरदार वादळासह पाऊस झाला. यात अनेक वृक्ष उन्मळून पडल्याने अंकलेश्वर-बऱ्हाणपूर मुख्य मार्गावरील शहादा-शिरपूर रस्त्यावरील वाहतूक सुमारे दीड तास खोळंबली होती. स्थानिक नागरिकांच्या मदतीने तात्पुरती उपाययोजना करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. घटनेला आठवडा उलटला, परंतु अद्यापही अनेक वृक्ष मुख्य रस्त्यावरच पडून असल्याने रात्री अपरात्री अपघाताची मोठी शक्यता वर्तविण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने तात्काळ रस्त्यावर उन्मळून पडलेले वृक्ष बाजूला सारुन पूर्ण रस्ता वाहतूकीसाठी खुला करावा, अशी मागणी होत आहे.

शहादा तालुक्यातील पूर्व भागात गेल्या आठवड्यात जोरदार वादळ वाऱ्यासह सुमारे पाऊण तास वळीवाच्या पाऊस बरसला. त्यात शेकडो वृक्ष उन्मळून पडल्याने शहादा शिरपूर हा मुख्य रस्ताही वाहतुकीसाठी काही



काळ बंद झाला होता. पोलीस व स्थानिक नागरिकांच्या मदतीने जेसीपीच्या साहाय्याने झाडे बाजूला सारत रस्ता वाहतुकीसाठी तात्पुरता सुरू करण्यात आला. परंतु या घटनेला आठवडा झाला तरीही संबंधित विभागातर्फे अद्याप पावेतो रस्त्यावरील उन्मळून पडलेले वृक्ष बाजूला केले नसल्याने वाहतुकीसाठी अडथळा ठरत आहे. अंकलेश्वर-बऱ्हाणपुर या राष्ट्रीय महामार्गावरील शहादा-शिरपूर हा रस्ता यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत होता.

परंतु तो आता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग जळगांवकडे वर्ग झाल्याने स्थानिक नागरिकांना याबाबत तक्रार कुठे करावी हे माहित नसल्याने अद्याप पावतो वृक्ष रस्त्यावरच असल्याने वाहतुकीला अडथळा ठरत आहे.

> आठवडाभरापूर्वी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे हिंगणी फाटा ते अनरदबारी रस्त्यालगतचे वृक्ष उन्मळून पडले त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता तात्काळ भेट देऊन बरेच वृक्ष जेसीबीच्या सहाय्याने बाजूला करण्यात आले आहे. काही राहिलेले, वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे पडलेले वृक्ष त्वरित बाजूला करण्यात येतील.
>
> **- चंदन गायकवाड,**
> प्रकल्प अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग जळगाव

**अपघाताला निमंत्रण**

शहादा-शिरपूर रस्ता हा पूर्वी खड्ड्यांमुळे अपघाताला निमंत्रण देणारा ठरला होता. आता रस्ता नविन तयार झाल्याने वाहने भरधाव वेगाने धावतात. त्यातच आठवडाभरापूर्वी झालेल्या जोरदार वादळी पावसाने फेस फाटा ते तोरखेडा फाटा दरम्यान अनेक वृक्ष उन्मळून पडल्याने रात्री अपरात्री समोरचे वाहन दिसत नसल्याने उन्मळून पडलेले वृक्ष अपघातास कारणीभूत ठरत आहेत. संबंधित विभागाने तात्काळ रस्त्यावरील वृक्ष हटवावेत अशी मागणी परिसरातील वाहनधारक व नागरिकांकडून होत आहे.

## शॉर्ट न्यूज

### कालिदास ब्राह्मणे सेवानिवृत्त



■ बोराडी । वार्ताहर

येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय व दे.फ.आ.ना.दे.कनिष्ठ महाविद्यालयाचे शिपाई कालिदास आमदा ब्राम्हणे हे दि.३१ मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत.त्यानिमित्त त्यांचा निरोप समारंभ दि.२५ मे रोजी विद्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान विद्या प्रसारक संस्थेचे विश्वस्त शामकांत पाटील हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून धुळे-नंदुरबार ग.स बँकेचे संचालक शशांक रंधे,प्राचार्य एन.बी.पाटील उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांची रुग्णालयाला भेट



■ शिरपूर । प्रतिनिधी

एच.आर.पटेल द्वितीय वर्ष बी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी आरोग्य, क्लिनिकल फार्मसी क्षेत्रातील सेवा समजून घेण्यासाठी व अभ्यासक्रमाचा भाग म्हणून इंदिरा गांधी मेमोरिअल रुग्णालयाला नुकतीच भेट दिली. याप्रसंगी द्वितीय वर्ष बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी रुग्णालयातील विविध विभाग, औषधी विभाग, भौतिक उपचार, अतिदक्षता विभाग, ऑर्थोपेडिक विभाग, क्ष- किरण विभाग, बालरोग विभाग, रोगनिदानशास्त्र, अर्भक अतिदक्षता विभाग, शस्त्रक्रिया विभाग आदी विभागांना भेट दिली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन देखील विभाग प्रमुखांकडून करण्यात आले. विद्यार्थ्यांनी रुग्णालय परिसराचे निरीक्षण केले. विद्यार्थ्यांनी रुग्णांशी देखील संवाद साधला व त्यांचे समुपदेशन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी इंदिरा गांधी मेमोरिअल हॉस्पिटल वैद्यकीय अधिकारी डॉ. गोपाल जोशी, विष्णुदास गिरासे, शुभम सूर्यवंशी यांनी अनमोल सहकार्य लाभले. याप्रसंगी महाविद्यालयाचे ट्रेनिंग प्लेसमेंट हेड प्रा. विवेकानंद चटाप, प्रा. सुशांत आमले, प्रा. शोएब मणियार, प्रा. कल्याणी राजपूत, विद्यार्थी उपस्थित होते.

### बियाण्यांची उगम क्षमता तपासा



■ बोराडी । वार्ताहर

येत्या खरीप हंगामात सोयाबीनचा तुटवडा भासू नये यासाठी शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या सोयाबीनची उगवण क्षमता तपासून तेच बियाणे पेरणीसाठी वापर करावे असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. तालुका कृषी अधिकारी संजय हि. पवार व मंडळ कृषी अधिकारी एम जी ढोडरे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्या वतीने क्षेत्रीय स्तरावर प्रात्यक्षिक घेतले जात आहे. शेतकऱ्यांनी घरच्या घरी तपासणी करण्यासाठी गोणपाट पद्धत या पद्धतीत शेतकरी स्वतः पोत्यावर बियाणे ठेवून त्याची उगम क्षमता तपासू शकतात. यावेळी सोयाबीन उगम क्षमता प्रात्यक्षिक तथा मार्गदर्शन करतांना कृषी सहाय्यक निलेश राजपूत, कृषी पर्यवेक्षक संजय पवार, महेंद्र पाटील व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# बहिणीने टाहो फोडत दिली आपल्या भावाला आर्त हाक

■ बोराडी । वार्ताहर

वीरमरण आलेल्या शिपाई राहुल पावरा यांची बहीण महसूल विभागात मंडळ अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी भाष आमुक छुडीन गयु तू पछु आव... या शब्दात आपले भावाला परत येण्यासाठी आर्त हाक दिली..

राज्य राखीव पोलिस बल गटक्रमांक सहामधील राज्य आपत्ती प्रतिसाद दलावरच आपत्ती ओढावली आहे. गुरुवारी सकाळी अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील सुगाव बु. शिवारात वनविभागाच्या रोपवाटिकेजवळ प्रवरा नदीत मृतदेह शोधत असताना झालेल्या दुर्घटनेत एसडीआरएफची बोट उलटली.



दुर्घटनेत एक उपनिरीक्षक व दोन अंमलदारांना जलसमाधी मिळाली. वीरगती प्राप्त झालेल्यांमध्ये पोलिस शिपाई राहुल गोपीचंद पावरा (३१) यांचा समावेश आहे. राहुल यांच्या पत्नी गर्भवती असून पतीला वीरमरण प्राप्त झाल्याने पत्नीसह पावरा कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

नांदर्डे सारख्या छोट्याश्या लोकवस्तीत आदर्श परिवार म्हणून नावलौकिक असलेला साळुंखे परिवार वडील गोपीचंद पावरा हे राज्य राखीव पोलीस बलात कर्मचारी होते व आपल्या वडिलांच्या विचारांचा वारसा पुढे नेत राहुल पावरा हे देखील शिपाई पदावर भरती झाले. आई वंशीबाई पावरा या गृहिणी असून मोठा भाऊ नरेश पावरा हे पण राज्य राखीव पोलीस बलात कार्यरत आहेत व बहीण सुमन पावरा या देखील सर्कल अधिकारी आहेत.

पोलीस शिपाई राहुल पावरा यांच्यावर रात्री १२.३० वाजेच्या सुमारास नांदर्डे येथिल शेतात विराट जनसमुदायांच्या साक्षीने अमर रहे अमर रहे शहीद राहुल अमर रहे च्या जयघोषात साश्रुनयनांनी अंत्यसंस्कार करण्यात आले.

शासकीय इतमामात झालेल्या या अंत्यसंस्कार प्रसंगी आ.काशीराम पावरा,आत्मनिर्भर भारत संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा बोराडी गावाचे उपसरपंच राहुल रंधे यांनी शहीद राहुल पावरा यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहून आदरांजली वाहिली. या शिवाय पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे,उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत सोनवणे,नायब तहसीलदार अधिकार पेंढारकर,विजय पाटील,पोलीस निरीक्षक कांतीलाल पाटील,पीएसआय सुरेश पांचाळ यांनी पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली.

तत्पुर्वी पोलीस दलाच्या तुकडीने बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडून मानवंदना दिली. यावेळी दोन्ही तुकडीच्या बँड पथकांनी शोकधून वाजवली. तिरंग्यामधील शहीद शिपाई राहुल पावरा यांचे पार्थिक दर्शनासाठी ठेवण्यात आले होते.

# शेती व्यवसाय तोट्यातच

■ धुळे । प्रतिनिधी

व्यवसायातून कोणतेही उत्पादन घेण्यासाठी रासायनिक, सेंद्रिय खतांचा वापर करणे महागडे ठरत आहे. परिणामी शेती व्यवसायात तोटाच सहन करावा लागतो. रासायनिक खतांचे भाव वाढले आहेत आणि सेंद्रिय खत वापरले तर त्याचा एकूण उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. लागवड खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या तुलनेत शेतमालाच्या आधारभूत किमती मात्र फारच कमी आहे. त्यामुळे या व्यवसायात तोटा सहन करावा लागतो. रासायनिक खतांचा व तणनाशक औषधांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने जमिनीचा स्तर घसरला आहे. तसेच यामुळे जमिनीत हवा खेळती राहत नाही, पाण्याचा निचराही होत नसल्याने उत्पादनात घट येत आहे. शेती पुरेपूर रासायनिक खतांच्या वापराची झाली आहे. त्यामुळे सेंद्रिय खते त्वरित कार्य करणे शक्य नाही, यासाठी भरपूर अवधी लागेल, यासाठी काही प्रमाणात सेंद्रिय खतांचा वापर करावा लागेल.

सेंद्रिय खतांचाही तुटवडा

शिरपूर तालुक्यात बरेच शेतकरी सेंद्रिय खतांचा वापर करून शेती व्यवसाय करण्यावर भर देत आहेत, पण सेंद्रिय खत स्वतः अंगमेहनत करून तयार करावे लागते, पण असे मात्र खूप कमी शेतकरी करतात, यामुळे सेंद्रिय खतांचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे पारंपरिक शेतीच कामाची ठरते.

# ग्रामीण भागात मातीच्या घराच्या डागडुजीची लगबग सुरु

■ वालखेडा । वार्ताहर

अलीकडच्या काळात स्लॅबचे घराचे प्रमाण वाढले असले तरीही ग्रामीण भागात आजही कौलारू मातीच्या घरांची संख्या आज ही कमी नाही गेल्या काही दिवसापासून अशा घरांची दुरूस्तीचे काम अनेकांनी हाती घेतलेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात घर दुरुस्तीची लगबग सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे

ग्रामिण भागात अनेक मातीचे घरे आहेत पावसाळ्यापूर्वी या घरांच्या छताचे दुरुस्ती करण्यात येते. जून महिन्यात पावसाळ्याला सुरुवात होणार असल्याने घराच्या दुरुस्तीची लगबग सुरू आहे. ग्रामीण भागात आजही मातीचे कैलारु असलेल्या घरांवरती कागद टाकून त्यावर माती टाकण्याचे काम सुरू आहे



ग्रामीण भागामध्ये आजही बहुतांश प्रमाणात मातीची घरी आहेत. आजच्या पक्या घरांच्या जमान्यात ही मातीचे घरे आपले अस्तित्व टिकवून आहेत. तर येत्या काही दिवसात पावसाळा सुरू होणार असल्याने जुन्या घरांच्या दुरुस्तीला ग्रामीण भागात वेग आला आहे तर पावसाळ्यापूर्वी ग्रामीण भागात मातीची घरी दुरुस्तीसाठी घरमालकांचे लगबग सुरू आहे

मातीची घरे आज ही चांगल्या परिस्थितीत उभी आहेत त्यांची प्रत्येक वर्षी गाळमातीसह घर दुरुस्ती करावी लागते जीर्ण झालेले लाकडू बदलण्यासह देखभाल करून मातीच्या घरांची जपवणूक आज बोटावर मोजणीतच नागरिक करताना दिसून येत आहेत

ग्रामीण भागात मातीच्या घरांची दुरुस्ती करण्याचे लगबग सुरू असून पावसाळी दिवस जवळ आल्याने पावसाळ्यापूर्वी ही कामे आटोपणे गरजेचे असते मात्र अशी घरे दुरुस्त करण्याचा अनुभव काहीच लोकांना असल्याने संबंधितांची मनधरणी करण्याचे घरमालकांच्या जिवारी येत आहे तर नातेवाईकांच्या मदतीनेच घरांची दुरुस्ती करावी लागत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे

# एसव्हीकेएम इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये माहिती सत्र

■ धुळे । प्रतिनिधी

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलित धुळे येथील एसव्हीकेएम इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीने गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग आणि एचपीव्ही लस यावर माहितीपर व्याख्यान आयोजित केले होते.

या सत्रात डॉ. गीतांजली सोनवणे (एमबीबीएस,डीजीओ,महिलारुग्णालय, धुळे) यांनी मार्गदर्शन केले. डॉ.सोनवणे यांनी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची कारणे आणि एचपीव्ही २२



लसीची प्रतिबंधात्मक भूमिका याविषयी सर्वसमावेशक माहिती दिली.

या कार्यक्रमात पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूटचे सदस्य उपस्थित होते. त्यांनी पुरुष आणि महिला दोघांसाठी एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि कर्करोगाच्या प्रतिबंधात त्याच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर जोर दिला. या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. श्रद्धा सुकदेवे यांनी केले.

सदर कार्यक्रम वूमन्स फोरम च्या माध्यमातून समन्वयक प्रा. मृणाली पाटील व डॉ. गिरीजा भवर यांनी नियोजन केले. डॉ. योगिता गोयल यांनी डॉ. गीतांजली सोनवणे यांच्या परिचय करून देत त्यांच्या अनमोल मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले. प्राचार्य डॉ. समीर गोयल यांनी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाविषयी जागरूकता आणि एचपीव्ही लसीकरणाचे फायदे सांगितले.

# हस्तीचे नरेश सावंत यांचे एएनओ प्रशिक्षण पूर्ण

■ मालपूर । वार्ताहर

हस्ती पब्लिक स्कूल अ‍ॅण्ड ज्यु. कॉलेज दोंडाईचा येथील ज्यु. डिव्हिजन एनसीसी इंस्ट्रक्टर नरेश रघुनाथ सावंत यांनी असोसिएट एनसीसी ऑफिसर प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.



या प्रशिक्षणात संपूर्ण भारतातून विविध राज्यातील एनसीसी इंस्ट्रक्टर सहभागी झाले होते. यात हस्ती स्कूलचे एनसीसी इंस्ट्रक्टर नरेश सावंत यांची एएनओ प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली होती. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांचे दोंडाईचा रेल्वे स्थानकावर आगमन झाले. यावेळी त्यांचे हस्ती स्कूल परिवारातर्फे चेअरमन कैलास जैन यांनी पुष्पमाला प्रदान करून स्वागत केले. यावेळी हस्ती स्कूल चेअरमन कैलास जैन, माजी व्हा. चेअरमन मेजर प्रा. दिलीप वाघेला, डिरेक्टर सुगंधा जैन, शितल जैन, प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, मुख्याध्यापक सदाशिव महाजन, रघुनाथ सावंत, आई प्रमिलाबाई, पत्नी नंदिनी, बहिण सुरेखाबाई, भाऊ योगेश, भाचा ओम, हस्ती स्कूल परिवार शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# भाटपुरा येथील उन्नती कोळीचे बारावीत यश

■ धुळे । प्रतिनिधी

घरची परिस्थिती बेताचीच. कोणताही क्लास लावण्यासाठी फी नाही. दररोज ४५ किलोमीटर अपडाऊन करून सेल्फ स्टडीने विद्यार्थिनीने मुलींमध्ये पहिला क्रमांक मिळविला.

शिरपूर तालुक्यातील भाटपुरा येथील विद्यार्थिनी उन्नती ईश्वर कोळी



हिने बारावी परीक्षेत शिरपूर शहरातील एच. आर. पटेल महाविद्यालयात शिक्षण घेतले. दररोज दोन्हीं बाजूंनी ४५ किलोमीटर अपडाऊन करूनही बारावी परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले.

उन्नतीने बारावीत ८९.८३ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला. विशेष म्हणजे तिने आयटी विषयात १०० गुण मिळविले आहेत.

# मयूरी पवार जिल्ह्यात मुलींमध्ये प्रथम

■ दोंडाईचा । श.प्र.

मालपुर (ता. शिंदखेडा) येथील मयुरी चतुर पवार ही बारावी सायन्सच्या परीक्षेत ९३ टक्के गुण मिळवून शिरपूर तालुक्यात



प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली असून मुलींमध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली तिच्या यशाबद्दल तिचा शिरपूर एज्युकेशन सोसायटीतर्फे नुकताच सत्कार करण्यात आला.

# एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

■ शिरपूर । प्रतिनिधी

येथील एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयात गौरव-२०२३ वार्षिक पारितोषक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमालाशिरपूरएज्युकेशन सोसायटीच्या संचालिका रेशा पटेल, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि सी.एस.व्ही. कन्सल्टंट चे सिनियर असोसिएट समाधान धनगर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, डॉ. पी. ओ. पाटील, डॉ. पी. बी. निनावे, मयूर गिरासे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी प्रास्ताविकात म्हणाले, महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच कर्मचारी आणि



विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाची व मेहनितीची पोच पावती म्हणून महाविद्यालयाकडून असा उपक्रम प्रथमच राबविला जात आहे. काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याचं काम सार्थकी लागल्याची भावना त्यांच्या मनात उत्पन्न व्हावी त्यातून पुढील कामास सकारत्मक उर्जा व वातावरण निर्माण होऊन संस्थेच्या नावलौकिकात भर पडण्याजोगे काम व्हावे या उदेशाने सदर उपक्रम राबिण्यात आल्याचे मत त्यांनी व्यक्त केले

रेशा पटेल यांनी यावेळी सांगितले की, शिक्षण हि आयुष्यभर चालणारी प्रक्रिया असून त्यातून आपण काहीना काही घेतले पाहिजे. जीवन जगण्याची व सार्थकी लागण्याची कला विकसित होत असते. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा हा आयोजित गुणगौरव सोहळा खरच प्रेरणादायी व कौतुकास्पद आहे.

उत्कृष्ट नाविन्यपूर्ण शिक्षक पुरस्कार प्रा. विशाल एस.बागुल, शिक्षक यंग रिसर्चर अवार्ड डॉ. जमीर जे. खान, शिक्षकेतर (तांत्रिक कर्मचारी) बेस्ट नॉन-टीचिंग अवार्ड विनोद एच. पटेल, शिक्षकेतर (अतांत्रिक कर्मचारी) बेस्ट नॉन-टीचिंग अवार्ड हिम्मत पी. पवार, गणेश एस. गोसावी, विद्यार्थी उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार तेजस गांगुर्डे (अंतिम वर्ष बी. फार्म.), राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट स्वयंसेवक सार्थक शाह (अंतिम वर्ष बी. फार्म.), बेस्ट लायब्ररी युजर अवार्ड शिवदास पाटील (अंतिम वर्ष बी. फार्म.). सूत्रसंचालन प्रा. कल्याणी राजपूत यांनी व आभार रितिका पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांच्या मार्गदर्शनाखाली पुरस्कार निवड समिती, रजिस्ट्रार संजय बागुल, प्रा. असमा पठाण, मयूर माळी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी संयोजन केले.

* धुळे । शहरातील अनेक वसाहतींतील पथदिवे गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहेत. परंतु, याबाबत महापालिकेच्या विद्युत विभागाने दखल घेतलेली नाही. नागरिकांनी अनेक वेळा तक्रार करुनही त्याचा उपयोग झालेला नाही.

**CHANGE OF NAME**

My Old Name was **PATHAN AKHTARHUSEN MUNIRKHA** My New Name is **AKHTARHUSAIN MUNIRKHA PATHAN** Documents - Add.A: TP No.86/2, Islampura, Amalner, Dist. Jalgaon-425401.

**CHANGE OF NAME**

MY PREVIOUS NAME WAS **GANGA MADHAVDAS SINDHI** AND MY NEW NAME IS **SANJANA RAKESH TEHALYANI**, PLOT NO.2, SHIVSAGAR PARK, SAKRI ROAD, DHULE M S

**SANJANA RAKESH TEHALYANI**

जा.क्र./न्या.लि.१/१९७९/२४
धर्मदाय सह आयुक्त साहेब कार्यालय, जानकी प्लाझा, पहिला मजला, नाशिक - पुणे रोड, व्दारका नाशिक - ४२२०११
फोन नं. २५९७३४०, दिनांक : २४/५/२०२४

**चौ. अर्ज क्रं. ०६/२०२४** **कलम ४७ अन्वये**

**नाशिक येथील मे. धर्मदाय सह आयुक्त सो., नाशिक विभाग, नाशिक यांचे कोर्टात...**

०१. दि व्यापारी असोसिएशन् शिरपुर, जि. धुळे
नो. क्रं. ई / २९ / धुळे
श्री. कैलासचंद्र रतनलाल अग्रवाल वगैरे ११.................अर्जदार
विरुध्द
संतोष धोंडु चौधरी वगैरे २.................................सा.वाला

ज्या अर्थी अर्जदार श्री. कैलासचंद्र रतनलाल अग्रवाल यांनी दि व्यापारी असोसिएशन्, शिरपुर ता. शिरपुर, जि. धुळे. पी.टी.आर.क्रं.ई /२९/धुळे या न्यासाचे पुर्वीचे विश्वस्तांचा कालावधी संपल्याने, नविन विश्वस्त म्हणुन

| | |
|---|---|
| १. श्री. कैलासचंद्र रतनलाल अग्रवाल | रा. नेहरू नगर, मेन बाजारपेठ, शिरपुर, जि. धुळे, |
| २. श्री. महेंद्रकुमार कन्हैय्यालाल अग्रवाल | रा.१२४ अ, सुभाष कॉलनी, शिरपुर, जि. धुळे. |
| ३. श्री. मोहनराव पंडीतराव पाटीलफ | रा. खालचे गाव, ब्रम्हटेक, शिरपुर, जि. धुळे |
| ४. श्री. युवराज गिरीशचंद्र जैन | रा. मेन रोड, शिरपुर, जि. धुळे. |
| ५. श्री. सुभाषचंद्र बन्सीलाल अग्रवाल | रा. नेहरु रोड, मेन बाजारपेठ, शिरपुर, जि. धुळे. |
| ६. श्री. घनशाम ताराचंद अग्रवाल | रा. आदर्श नगर, शिरपुर, जि. धुळे, |
| ७. श्री. प्रद्युतकुमार कंकुचंद शहा | रा. सराफ बाजार, शिरपुर, जि. धुळे. |
| ८. श्री. राजेशकुमार किसनलाल अग्रवाल | रा.आदर्श नगर, शिरपुर, जि. धुळे. |
| ९. श्री. दिनेश संतोष अग्रवाल | रा. १०९ सुभाष कॉलनी, शिरपुर, जि. धुळे. |
| १०. श्री. बाबुलाल भिका माळी | रा. खालचे गांव, माळी गल्ली, शिरपुर, जि. धुळे. |
| ११. श्री. जितेंद्र लखेसिंग गिरासे | रा.३ जनता कॉलनी, दोंडाईचा, जि. धुळे. |

यांची न्यासाचे विश्वस्त म्हणुन नेमणुक होवुन, मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या नोटिसीव्दारे कळविण्यात येते की, वरील न्यासाचे विश्वस्त नेमणुकी संदर्भात कोणाचीही हरकत असल्यास, सदर हरकत मे. कोर्टात सदर नोटिस प्रसिध्द झालेपासुन तीस दिवसाचे आंत नोदवाव्यात सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करुन वर नमुद केलेल्या न्यासाचे विश्वस्त म्हणुन नेमणुक करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हि नोटिस माझे सहीनिशी व धर्मदाय सह आयुक्त सो.,नाशिक यांचे शिक्यानिशी आज दिनांक २४/५/२०२४ रोजी दिली.

कळावे.हि चौकशीची नोटिस
नाशिक
दिनांक २४/५/२०२४

शिक्का

**अधीक्षक,**
**धर्मदाय सह आयुक्त कार्यालय, नाशिक**





# इंडी आघाडी मतांसाठी मुजरा करते!

## पाटणा येथे जाहीर सभेत इंडिया आघाडीवर टीका

**पाटणा । वृत्तसंस्था**

देशात आज लोकसभेच्या सहाव्या टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडत आहे. आता १ जून रोजी शेवटचा टप्पा संपन्न होईल. त्यामुळे निवडणुकीचा प्रचारही शेवटचे काही दिवस उरला आहे. बिहारच्या पाटणा येथे एका जाहीर सभेला संबोधित करत असताना मोदींनी इंडिया आघाडीला इंडी आघाडी असे म्हणत टीका केली. विरोधकांकडून सातत्याने आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. यावर उत्तर देताना मोदी म्हणाले की, मतपेटीचे राजकारण करत असताना इंडी आघाडी त्यांच्यासमोर मुजरा करत आहे. पतंप्रधान मोदींच्या या नव्या विधानामुळे आता वाद निर्माण झाला असून काँग्रेस नेत्यांनीही या विधानावर पलटवार केला आहे.

**काय म्हणाले पंतप्रधान मोदी?**

पाटणा येथील जाहीर सभेत बोलताना



म्हणाले, इंडिया आघाडीला मतपेटीची गुलामी करायची असेल त्यांच्यासमोर जाऊन मुजरा करायचा असेल तर करावा. मी मात्र एससी, एसटी आणि ओबीसींच्या आरक्षणासाठी खंबीरपणे उभा आहे. राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसने एकत्र येऊन यादव, कुर्मी, कुशवाहा, तेली, कान्हू, निषाद आणि पासवान या समाजाच्या आरक्षणावर दरोडा घातला. संविधानानुसार धर्माच्या आधारावर कुणालाही आरक्षण देता येत नाही. पण काँग्रेसने मतपेटीच्या राजकारणासाठी कायद्यात बदल केला.

**एससी-एसटी-ओबीसींचे अधिकार अबाधित ठेवणार -मोदी**

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, आरजेडी, काँग्रेस आणि इंडिया आघाडीला संविधान बदलून संपूर्ण देशात धर्माच्या आधारावर आरक्षण द्यायचे आहे, या सत्यापासून ते तोंड लपवू शकत नाहीत. मी आज बिहारच्या या सामाजिक न्यायाच्या पूण्य भूमीतून संपूर्ण देश आणि बिहारला एक गॅरंटी देऊ इच्छितो. मी जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत एससी, एसटी, ओबीसी आणि अतिमागास वर्गाच्या अधिकारांना कुणालाही हिसकावू देणार नाही. ही मोदी गॅरंटी आहे.

माझ्यासाठी संविधान सर्वप्रथम आहे. माझ्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्त्वाचे आहेत. इंडिया आघाडीला मतपेटीची गुलामी करायची असेल तर त्यांनी करावी, त्यांच्यासमोर जाऊन मुजरा करावा. मी मात्र वंचितांच्या बाजूने खंबीरपणे उभा राहिल, अशा शब्दात मोदींनी इंडिया आघाडीवर टीका केली.

### उन्हात प्रचार केल्यामुळे मोदींच्या डोक्यावर परिणाम



पंतप्रधान मोदींच्या टीकेचा समाचार काँग्रेसकडून घेण्यात आला आहे. काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा म्हणाले की, आज पंतप्रधानांच्या तोंडून मुजरा शब्द ऐकला. मोदीजी तुम्ही स्वतःची काय अवस्था करून घेतली आहे? काही घेत का नाहीत? अमित शाह आणि जेपी नड्डा यांनी त्यांना तात्काळ उपचार मिळवून द्यावेत. कदाचित उन्हात सतत प्रचार केल्यामुळे त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. त्यांना उन्हात प्रचार करायची सवय नसेल.



# आयपीएल फायनलमध्ये 'पिच' ठरणार निर्णायक

## कोलकाता विरुध्द हैदराबादचा आज थरार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमिअर लीग अर्थात आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धा सुरु झाली असं म्हणेपर्यंत आता तिची फायनल उद्यावर येऊन ठेपली आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळणारी कोलकाता नाइटरायडर्स आणि पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली खेळणारी सनराइझर्स हैदराबाद या दोन टीम उद्या (२६ मे २४) चेन्नईतील एम. एस. चिदंबरम स्टेडियममध्ये आयपीएल फायनल खेळणार आहेत. ङ्गकेकेआरफ तिसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफी जिंकण्याच्या प्रयत्नात आहे तर हैदराबाद दुसऱ्यांदा आयपीएल जिंकू शकते. या संपूर्ण आयपीएलमध्ये सुरुवातीपासूनच पारडं जड असलेल्या राजस्थान रॉयल्सला हरवून हैदराबादने फायनल्समध्ये प्रवेश केला आहे. जो कॅप्टन टॉस जिंकेल तो पहिल्यांदा बॅटिंग घेईल हे स्पष्ट आहे.

श्रेयस हा कोलकाता नाइटरायडर्सचं नेतृत्व करत आहे तर हैदराबादच्या कॅप्टनपदाची धुरा कमिन्सच्या खांद्यावर आहे. उद्या (रविवार, २६ मे) होणाऱ्या या मॅचसाठी दोन्ही टीम्स कंबर कसून तयार आहेत. केकेआरने पहिल्या क्वालिफायर मॅचमध्ये विजय पटकावून फायनल्समध्ये प्रवेश मिळवला तर हैदराबादने दुसऱ्या क्वालिफायर मॅचमध्ये राजस्थानला धूळ चारत फायनलचं तिकिट पटकावलं. या मॅचमध्ये पिचची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहाणार आहे. चेन्नईतलं हे पिच कुणाची साथ देणार जाणून घेऊया.



चिदंबरम स्टेडियमचं पिच हे खरं तर बॉलर्ससाठी अधिक चांगलं आहे. त्यातही स्पिनर बॉलर्ससाठी ते उत्तम आहे. इथली विकेट स्पिन फ्रेंडली असल्यामुळे बॅट्समनची थोडी अडचण होऊ शकते. त्यांना इथे धावांचा डोंगर उभा करायचा असेल तर आधी पिचवर टिकून राहावं लागेल. एकदा सेट झाल्यानंतर ते फटकेबाजी करु शकतात. या पिचवर नेहमी बॉलर्सचा खेळ अधिक चांगला होतो. टॉस जिंकणारा कॅप्टन आधी बॅटिंग करायचा निर्णय घेईल. या सीझनमध्ये या पिचवर आठ मॅच झाल्या. पहिल्या टीमने केलेल्या रन्सचा पाठलाग करणाऱ्या टीमचा ५ मॅचमध्ये विजय झाला आहे. केकेआर विरुद्ध एसआरएच फायनलमध्येही पिच कसं आहे यावर बरंच काही ठरणार आहे.

या स्टेडियममध्ये आत्तापर्यंत ८४ आयपीएल मॅच खेळवण्यात आल्या आहेत. पहिल्यांदा बॅटिंग करणाऱ्या टीमचं पारडं इथे नेहमीच जड असतं. ४९ मॅच अशा टीमने आपल्या खिशात टाकल्या आहेत. दुसरी इनिंग खेळणाऱ्या टीमला ३५ वेळा विजय मिळाला आहे. पहिल्या इनिंगमध्ये चेन्नई सरासरी १६४ रन करत आली आहे. इथे झालेल्या दुसऱ्या क्वालिफायर मॅचमध्ये राजस्थानला हैदराबादने ठेवलेलं १७६ रन्सचं टार्गेट गाठणं शक्य झालं नाही. राजस्थानच्या बॅट्समनना रन्स करणं अवघड झालं होतं. तशातच हैदराबादच्या दोन स्पिनर्सनी राजस्थानच्या टीमला रोखण्यात यश मिळवलं. दुसऱ्या इनिंगपर्यंत विकेट स्लो होते. त्यामुळे अशा वेळी स्पिनर्सची कामगिरी महत्त्वाची ठरते.

# आशिष शेलार अन् मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये वाद!

## ठाकरे गटाचे अनिल परब यांचा दावा

**मुंबई । वृत्तसंस्था**

राज्यात काही ठिकाणी दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बैठका घेत आहेत. तसेच मान्सूनपूर्व कामाचा आढावाही त्यांच्याकडून घेण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी मराठवाड्यातील पाणी टंचाईचा आढावा घेणारी बैठक घेतली. त्यानंतर मुंबई महापालिकेच्या मान्सूनपूर्व कामाचा आढावा घेतला. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपाचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्यावर हल्लाबोल केला. तसेच मुख्यमंत्री शिंदे आणि आशिष शेलार यांच्यामध्ये वाद असल्याचे मोठे विधान अनिल परब यांनी केले आहे.

अनिल परब काय म्हणाले?

एका बाजूला मुख्यमंत्री सांगत आहेत की, जीवितहानी शून्य असेल. याचा अर्थ त्यांचा मुंबई महापालिकेवर विश्वास आहे. आता जे महानगरपालिकेवर कित्येक दिवसांपासून टीका करत आहेत, एका बाजूला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विश्वास दाखवत आहेत, तर दुसऱ्या बाजूला आशिष शेलार अविश्वास दाखवत



आहेत. त्यामुळे महायुतीमध्ये समन्वय नाही असे यावरून दिसते. श्रेयवादाची ही लढाई असू शकते. कदाचित कंत्राटदार आपल्याकडे धावत यावेत, अशा प्रकारचा उद्देशही यामागचा असू शकतो, असा आरोप अनिल परब यांनी केला आहे.

गेली कित्येक वर्ष शिवसेना जोपर्यंत सत्तेत होती तोपर्यंत शिवसेनेचे पक्षप्रमुख हे स्वत: मुंबईतील नालेसफाईची पाहणी करायचे. आदित्य ठाकरे यांच्यासह आम्ही जात होतो, पाहत होतो. आजही आम्ही जात आहोत. फक्त आम्ही गाजावाजा करत नाहीत. कारण सत्ता आमच्याकडे नाही, सत्ता त्यांच्याकडे आहे. प्रशासन त्यांचे आहे. प्रशासनावर दबाव आणून ते बाकी सर्व गोष्टी करून घेतात, मग नालेसफाईदेखील करून घेतली पाहिजे. जर पाणी तुंबले तर त्याला सरकार आणि प्रशासन जबाबदार राहिल, असे अनिल परब यांनी म्हटले.

अनिल परब पुढे म्हणाले,आशिष शेलार म्हणाले की २५ वर्ष मुंबई महापालिका आमच्या (शिवसेनेच्या) ताब्यात होती. आमच्या ताब्यात २५ वर्ष महापालिका होती. पण त्यातील २२ वर्ष ते (भाजपा) देखील आमच्याबरोबर सत्तेत होते. आता हे सर्व सोईच राजकारण सुरू आहे. आशिष शेलार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यामध्येही काहीतरी वाद आहे, असे मला दिसत आहे. त्याच कारण म्हणजे आशिष शेलार आरोप करतात आणि दुसरीकडे मुख्यमंत्री शिंदे महानगरपालिकेला क्लिन चीट देतात, असा दावा अनिल परब यांनी केला.

मुंबई महापालिका कशा पद्धतीने काम करते. याचे टप्पे आम्हाला माहिती आहेत. पहिला टप्पा, दुसरा टप्पा आणि तिसरा टप्पा पाहिल्यानंतर ठरवता येईल की नालेसफाई झाली की नाही. मात्र, आम्ही जे पाहतो आहोत त्यावरून तरी समाधानकारक काम झालेले नाही, असे अनिल परब यांनी सांगितले.



# ...तर आज पक्षाची ही अवस्था झाली नसती

## संजय शिरसाट यांचा उद्धव ठाकरेंना खोचक टोला



**मुंबई । वृत्तसंस्था**

देशात लोकसभेच्या निवडणुकीसाठी पाच टप्प्यांत मतदान पार पडले. आता आणखी दोन टप्पे बाकी आहेत. महाराष्ट्रातील पाचही टप्प्यांतील मतदान पार पडलेले आहे. लोकसभा निवडणूक पार पडल्यानंतर काँग्रेसने स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. या स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाला विशाल पाटील यांनी हजेरी लावल्यामुळे ठाकरे गटाने नाराजी व्यक्त केली. तसेच शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संजय विभुते यांनी यावरून काँग्रेसला इशारा दिला होता. काँग्रेसने पृथ्वीराज पाटील आणि विशाल पाटील यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी करत आक्रमक भूमिका त्यांनी घेतली होती. यावरून आता शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी ठाकरे गटावर खोचक शब्दात टीका केली आहे. आमची भूमिका मान्य केली असती तर आज पक्षाची ही अवस्था झाली नसती, असा टोला त्यांनी लगावला.

**संजय शिरसाट काय म्हणाले?**

सांगलीच्या ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुखांनी नाराजी व्यक्त केली ती वस्तुस्थिती होती. अनेक ठिकाणी आम्ही सांगायचो की काँग्रेस आणि राष्ट्रवादी तुमच्याबरोबर राहणार नाही. आता त्याचा अनुभव त्यांना सांगलीत आला. त्यांच्या सांगलीच्या जिल्हा प्रमुखांनी सांगितलं की, काँग्रेसने आम्हाला धोका दिला, त्याला सपोर्ट करायला राष्ट्रवादी होती. यापुढे आम्ही त्या पक्षाला विधानसभेची पायरी चढू देणार नाही, भलेही आमच्या पक्षाने कारवाई केली तरी, असे ते जिल्हाप्रमुख म्हणाले. अशीच भूमिका आमचीही होती. असे शिरसाट म्हणाले.

ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांवर आलेलं संकट पाहता आमच्या सारख्या कार्यकर्त्यांनाही मनस्थाप होत आहे. जर एकत्रितपणे काम केलं असतं आणि आमची भूमिका मान्य केली असती तर आज पक्षाची ही अवस्था झाली नसती. सांगलीच्या जिल्हा प्रमुखांनी केलेलं विधान हे खऱ्या अर्थाने मार्ग दाखवणारे विधान आहे, अशी खोचक टीका संजय शिरसाट यांनी केली.

# लंडनला जाण्यासाठी इंग्लिशमध्ये बोलावे लागते!

## सुनील राऊतांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना खोचक टोला

**मुंबई । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील मतदान आज पार पडत आहे. तर सातव्या टप्प्यातील निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. महाराष्ट्रातील पाचही टप्प्यातील मतदान झालेलं आहे. सध्या राज्यात काही ठिकाणी दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बैठका घेत आहेत. तसेच मान्सूनपूर्व कामाचा आढावाही त्यांच्याकडून घेण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी मराठवाड्यातील पाणी टंचाईचा आढावा घेणारी बैठक घेतली.



त्यानंतर मुंबई महापालिकेच्या मान्सूनपूर्व कामाचा आढावा घेतला. यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी मी लंडनला जाऊ शकत नाही, मला राज्यात काम करावे लागते, असा अप्रत्यक्ष टोला उद्धव ठाकरे यांना लगावला होता. यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सुनील राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या टीकेला प्रत्युत्तर देत लंडनला जाण्यासाठी इंग्लिशमध्ये बोलावे लागते, असा खोचक टोला लगावला आहे.

सुनील राऊत काय म्हणाले?

लंडनला जाण्यासाठी इंग्लिशमध्ये बोलावे लागते. तेथे मराठी आणि हिंदी भाषेत बोलणार का? ज्यांना लंडनला पोहोचता येत नाही तेच असे म्हणतात. मराठीत एक म्हण आहे, नाचता येईना आंगण वाकडे, त्यांनी लंडनला जावे. का जाऊ नये? मात्र, त्यांना माहिती आहे जर लंडनला गेलोत तर बाकीच्या ४० गद्दारांमध्ये फाटाफूट होईल. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लंडनला काय महाराष्ट्राच्या बाहेरही पडू शकत नाहीत, अशी खोचक टीका आमदार सुनील राऊत यांनी केली.

### एकनाथ शिंदे काय म्हणाले होते?

मी छत्रपती संभाजीनगरला बैठक घेतली. त्यानंतर मुंबईत महापालिकेच्या बैठकीला आलो. दोन दिवसांनतर राज्य आपत्ती व्यवस्थापनाची एक महत्वाची बैठक आहे. आता मान्सून पूर्व जी काळजी घ्यायला हवी ती घेतलीच पाहिजे. मी लंडनला जाऊ शकत नाही. मला मुख्यमंत्री केलं आहे. त्यामुळे काम करावंच लागेल, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना नाव न घेता लगावला होता.

---

**विधीलिखित**

**सुरेशराव बोरकर,**
**ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर.**
**मो. : ९८५००१५५५८**

**रविवार, दि. २६ मे २०२४**

***-*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*-***

- **मेष** – भाग्यकारक घटना आज घडू लागतील.
- **वृषभ** – नातेवाईकांकडे जावे लागेल.
- **मिथुन** – सांसारीक वस्तुंची खरेदी कराल.
- **कर्क** – व्यापारी वर्गास अत्यंत भाग्यकारक दिवस राहील.
- **सिंह** – शिक्षणात लक्ष द्या. नंबर वन बना.
- **कन्या** – मातृ कार्य सोबत तर भाग्य राहील सोबत.
- **तूळ** – टेस्ट ट्युब बेबी करणेस उत्तम दिवस राहील.
- **वृश्चिक** – पैसाच पैसा मागील सर्व भर निघेल.
- **धनू** – उत्साहाचे भरात चुकीचे कामे करू नका.
- **मकर** – मनावर दडपण येणार आहे.
- **कुंभ** – भाग्याची दारे उघडणार आहे.
- **मीन** – वडिलांचे भाग्य ते आपले भाग्य राहील.

# महायुतीला सत्तेच्या दुरुपयोगाचे परिणाम भोगावे लागणार -बच्चू कडू

**मुंबई । वृत्तसंस्था**

महायुतीला सत्तेच्या दुरुपयोगाचे परिणाम भोगावे लागणार असा इशारा अमरावती मतदार संघात भाजपच्या विरोधात रणशिंग फुंकणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी दिला. पैसा आहे, सत्ता आहे म्हणून अतिरेक करु नका, असेही बच्चू कडू एका मुलाखतीत म्हणाले.

बच्चू कडूंनी भाजपवर यावेळी जोरदार निशाणा साधला. यावेळी त्यांना तुम्ही पोलिसांच्या पाया पडताय, असा एक व्हिडीओ आला होता, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, आता लोकशाही आहे. कसे आहे तुम्हाला सांगतो, पोलीस जेव्हा एखाद्या पक्षाचे कार्यकर्ते म्हणून वागत असतील. आमच्याकडे परवानगी होती, सर्व काही होते. उद्या सभा आहे आणि आज आम्हाला परवानगी नाकारतात हा अतिरेक आहे. असा प्रकार मुघल काळातही फार कमी होत होता.

### भाजपचा एकही माणूस घोटाळे करत नाही का?

महायुतीला देशभरात सत्तेच्या दुरुपयोगाचे परिणाम भोगावे लागतील. ईडीमध्ये एकाच पक्षाची माणसं का दिसतात. भाजपचा एकही माणूस घोटाळे करत नाही का? असा प्रश्नही बच्चू कडू यांनी उपस्थित केला.



**हा अतिरेक आहे**

राजकारण्यांनी काही गोष्टी जपल्या पाहिजेत. त्याचेच परिणाम त्यांना भोगावे लागतील. पैसा आहे, सत्ता आहे म्हणून इतका अतिरेक करु नये. तुम्ही कोणाच्या घरात घुसणार का? आमच्याकडे त्या मैदानाची परवानगी होती. आमच्यासाठी काही क्षण का होईना ते घर झालं होतं. आमच्या घरात घुसून तुम्ही आम्हाला खाली केलं असेल तर हा अतिरेक आहे. हा असा प्रकार कोण सहन करेल? असेही बच्चू कडू यावेळी म्हणाले.




देशदूत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, ग.नं.६ राणी मेडिकलजवळ, धुळे-४२४००१ येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४. **RNI.No. 68336/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)

cmyk